| १८६ | रहांगडाले, श्री. विजय भरतलाल (तिरोरा) | ४ | १ | ८०% |
| १८७ | राजाळे, श्रीमती मोनिका राजीव (शेवगाव) | ४ | १ | ८०% |
| १८८ | राजपुत, श्री. उदयसिंग सरदारसिंग (कन्नड) | ५ | -- | १००% |
| १८९ | राणा, श्री. रवि (बडनेरा) | ३ | २ | ६०% |
| १९० | राणे, श्री. नितेश नारायण (कणकवली) | ५ | -- | १००% |
| १९१ | राणे, श्री. सुनील दत्तात्रय (बोरिवली) | ४ | १ | ८०% |
| १९२ | राठोड, श्री. तुषार गोविंद (मुखेड) | ५ | -- | १००% |
| १९३ | राऊत, डॉ. नितीन (नागपूर उत्तर) | ५ | -- | १००% |
| १९४ | राऊत, श्री. राजेंद्र विठ्ठल (बार्शी) | २ | ३ | ४०% |
| १९५ | राऊत, श्री. सुनिल राजाराम (विक्रोळी) | ५ | -- | १००% |
| १९६ | रावल, श्री. जयकुमार जितेंद्रसिंह (सिंदखेडा) | ४ | १ | ८०% |
| १९७ | रायमुलकर, श्री. संजय भास्कर (मेहकर) | ५ | -- | १००% |

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १९८ | सागर, श्री. योगेश (चारकोप) | ५ | -- | १००% |
| १९९ | साकोरे-बोर्डीकर, श्रीमती मेघना (जिंतूर) | ४ | १ | ८०% |
| २०० | साळवी, श्री. राजन प्रभाकर (राजापूर) | ५ | -- | १००% |
| २०१ | सरनाईक, श्री. प्रताप बाबुराव (ओवळा-माजीवडा) | ५ | -- | १००% |
| २०२ | सरवणकर, श्री. सदा (माहिम) | ४ | १ | ८०% |
| २०३ | ससाने, श्री. नामदेव जयराम (उमरखेड) | ३ | २ | ६०% |
| २०४ | साटम, श्री. अमीत भास्कर (अंधेरी पश्चिम) | ५ | -- | १००% |
| २०५ | सातपुते, श्री. राम विठ्ठल (माळशिरस) | ३ | २ | ६०% |
| २०६ | सावंत, श्री. विक्रमसिंह बाळासाहेब (जत) | ४ | १ | ८०% |
| २०७ | सावरकर, श्री. रणधीर प्रल्हादराव (अकोला पूर्व) | -- | ५ | -- |
| २०८ | सावरकर, श्री. टेकचंद श्रावण (कामठी) | १ | ४ | २०% |
| २०९ | सावकारे, श्री. संजय वामन (भुसावळ) | ५ | -- | १००% |
| २१० | सेल्वन, कॅप्टन आर तामिल (सायन कोळीवाडा) | ४ | १ | ८०% |
| २११ | शाह, श्री. फारुक अन्वर (धुळे शहर) | ३ | २ | ६०% |
| २१२ | शाह, श्री. पराग (घाटकोपर पुर्व) | ५ | -- | १००% |

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २१३ | शेख, श्री. अस्लम रमजानअली (मालाड पश्चिम) | ५ | -- | १००% |
| २१४ | शेख, श्री. रईस कासम (भिवंडी पुर्व) | ५ | -- | १००% |
| २१५ | शेलार, ॲड. आशिष बाबाजी (वांद्रे पश्चिम) | ५ | -- | १००% |
| २१६ | शेळके, श्री. सुनिल शंकरराव (मावळ) | ५ | -- | १००% |
| २१७ | शिंदे, श्री. बबनराव विठ्ठलराव (माढा) | ५ | -- | १००% |
| २१८ | शिंदे, श्री. महेश संभाजीराजे (कोरेगाव) | ५ | -- | १००% |
| २१९ | शिंदे, श्रीमती प्रणिती सुशीलकुमार (सोलापूर शहर मध्य) | ४ | १ | ८०% |
| २२० | शिंदे, श्री. संजयमामा विठ्ठलराव (करमाळा) | ५ | -- | १००% |
| २२१ | शिंदे, श्री. श्यामसुंदर (लोहा) | ५ | -- | १००% |
| २२२ | शिंगणे, डॉ. राजेंद्र भास्करराव (सिंदखेड राजा) | १ | ४ | २०% |
| २२३ | शिरोळे, श्री. सिध्दार्थ अनिल (शिवाजीनगर) | ४ | १ | ८०% |
| २२४ | शिरसाट, श्री. संजय पांडुरंग (औरंगाबाद पश्चिम) | ४ | १ | ८०% |
| २२५ | सिद्दिकी, श्री. झीशान बाबा (वांद्रे पुर्व) | ३ | २ | ६०% |
| २२६ | सोळंके, श्री. प्रकाश (दादा) सुंदरराव (माजलगाव) | ५ | -- | १००% |

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २२७ | सोनवणे, श्रीमती लताबाई चंद्रकांत (चोपडा) | -- | ५ | -- |
| २२८ | सुर्वे, श्री. प्रकाश राजाराम (मागाठाणे) | ४ | १ | ८०% |
| २२९ | तनपुरे, श्री. प्राजक्त प्रसादराव (राहुरी) | २ | ३ | ४०% |
| २३० | तापकीर, श्री. भिमराव (अण्णा) धोंडीबा (खडकवासला) | ४ | १ | ८०% |
| २३१ | ठाकरे, श्री. आदित्य उध्दव (वरळी) | ४ | १ | ८०% |
| २३२ | ठाकरे, श्री. विकास पांडुरंग (नागपूर पश्चिम) | ४ | १ | ८०% |
| २३३ | ठाकूर, श्री. हितेंद्र विष्णु (वसई) | ४ | १ | ८०% |
| २३४ | ठाकूर, श्री. क्षितीज हितेंद्र (नालासोपारा) | ४ | १ | ८०% |
| २३५ | ठाकूर, श्री. प्रशांत रामशेठ (पनवेल) | ४ | १ | ८०% |
| २३६ | ठाकूर, श्रीमती विद्या जयप्रकाश (गोरेगाव) | ४ | १ | ८०% |
| २३७ | ठाकूर, ॲड. यशोमती चंद्रकांत (तिवसा) | ३ | २ | ६०% |
| २३८ | थोपटे, श्री. संग्राम अनंतराव (भोर) | ४ | १ | ८०% |
| २३९ | थोरात, श्री. विजय उर्फ बाळासाहेब भाऊसाहेब (संगमनेर) | ४ | १ | ८०% |
| २४० | थोरवे, श्री. महेंद्र सदाशिव (कर्जत) | ४ | १ | ८०% |
| २४१ | टिंगरे, श्री. सुनिल विजय (वडगाव शेरी) | ५ | -- | १००% |

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २४२ | टोपे, श्री. राजेशभैय्या (घनसावंगी) | ४ | १ | ८०% |
| २४३ | तुपे, श्री. चेतन विठ्ठल (हडपसर) | ४ | १ | ८०% |
| २४४ | वनगा, श्री. श्रीनिवास चिंतामण (पालघर) | ५ | -- | १००% |
| २४५ | वायकर, श्री. रविंद्र दत्ताराम (जोगेश्वरी पूर्व) | ५ | -- | १००% |
| २४६ | वानखडे, श्री. बळवंत बसवंत (दर्यापूर) | १ | ४ | २०% |
| २४७ | वरपुडकर, श्री. सुरेश अंबादासराव (पाथरी) | ३ | २ | ६०% |
| २४८ | उईके, श्री. अशोक रामाजी (राळेगांव) | २ | ३ | ४०% |
| २४९ | यादव (लोणीकर), श्री. बबनराव दत्तात्रय (परतूर) | ४ | १ | ८०% |
| २५० | येरावार, श्री. मदन मधुकर (यवतमाळ) | १ | ४ | २०% |
| २५१ | झनक, श्री. अमित सुभाषराव (रिसोड) | ४ | १ | ८०% |
| | **एकूण** | **९७७** | **२७८** | |

***

## विवरण क्रमांक - ७

## सन २०२४ च्या द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील (फेब्रुवारी-मार्च २०२४) दैनंदिन कार्यवाहीचा संक्षिप्त वृत्तांत

### सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४

अधिवेशनाचा शुभारंभ 'वंदे मातरम्' या गीताच्या समूह गायनाने झाला.

यानंतर राज्य गीताचे समूह गायन झाले.

श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्ष नेते यांनी, "राज्यातील जवळपास ८२ हजार आशा वर्कर्स आणि गट प्रवर्तक मागील दीड महिन्यांपासून आंदोलन करीत असणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात उपमुख्यमंत्री यांनी खुलासा केला.

१. उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्या सभागृहास सादर केल्या आणि तसे करीत असताना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ व २०३ (३) खाली मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे असे सांगितले.

माननीय अध्यक्षांनी, सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्या सभागृहास सादर करण्यात आल्या आहेत. या मागण्यांवरील चर्चा व मतदान मंगळवार दि. २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी होणार आहे. चर्चा व मतदानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमाने घेण्यात येतील त्या विभागांवरील कपात सूचना आज सोमवार दि. २६ फेब्रुवारी, २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील असे सांगितले.

श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्ष नेते यांनी, "कपात सूचना सादर करण्याची मुदत वाढवून देणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

कपात सूचना सादर करण्यासाठी मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी सायंकाळपर्यंत मुदत वाढवून देण्यात येत आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

२. सचिव-१ (कार्यभार) यांनी, विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केलेल्या ६ वि.स. विधेयकांची नावे व विधानपरिषदेने कोणत्याही शिफारशीशिवाय परत केलेल्या १ वि.स. विधेयकाचे नाव तसेच माननीय राज्यपाल यांची अधिसंमती मिळालेल्या १५ वि.स. विधेयकांच्या नावाची यादी वाचून दाखवली.

## ३. पुरःस्थापनार्थ :—

(१) सहकार मंत्र्यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्र्यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(३) मुख्यमंत्र्यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**माननीय अध्यक्षांनी खालील घोषणा केली—**

सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, २७ फेब्रुवारी हा दिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा केला जातो. अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२४ या कालावधीमध्ये "मराठी भाषा गौरव दिन" येत असून सदर कार्यक्रम मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी ४.०० ते सायं. ६.०० या वेळेत मध्यवर्ती सभागृहात साजरा करण्यात येणार आहे. मा.पीठासीन अधिकारी, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मराठी भाषा मंत्री, संसदीय कार्य मंत्री, दोन्ही सभागृहातील माननीय विरोधी पक्षनेते यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमामध्ये दोन्ही सभागृहांचे इच्छुक सन्माननीय सदस्य, पत्रकार व या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी सहभागी होऊन कविवर्य कुसुमाग्रज यांच्या कविता, ललित लेख, कथा, नाट्यकृती यांचे अभिवाचन व स्वरचित कविता यांचे सादरीकरण करणार आहेत. कृपया या कार्यक्रमास आपण सर्वांनी उपस्थित रहावे.

४. माननीय अध्यक्षांनी, श्री.मनोहर गजानन जोशी, माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री व माजी लोकसभा अध्यक्ष तसेच श्री. राजेंद्र सुखानंद पाटणी, वि.स.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधिमंडळाचे स्मृतिपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४**

श्री. विजय वडेट्टीवार (विरोधी पक्ष नेते) यांनी, "राज्यात पडलेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असल्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने मदत जाहीर करण्याची आवश्यकता", इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

१. **(१) उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री यांनी** पुढील अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले.—

(क) महाराष्ट्र भूविकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल,

(ख) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचे सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचा अनुक्रमे तेवीसावा व चोवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल.

**(२) महसूल मंत्री यांनी,** महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा छप्पन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

२. माननीय अध्यक्षांनी, महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ८(१) अन्वये खालील सन्माननीय सदस्यांना सभाध्यक्ष तालिकेवर नामनिर्देशित केले.—

(१) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(२) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(३) श्री. अमिन पटेल, वि.स.स.

श्री. बाळासाहेब थोरात वि.स.स. यांनी, 'अधिवेशन काळात तालिकेवर नामनिर्देशित केलेल्या सन्माननीय सदस्यांपैकी विशिष्ट सन्माननीय सदस्यांनाच तालिकेवर बसण्याची संधी दिली जात असणे', इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. विजय वडेट्टीवार (विरोधी पक्ष नेते) यांनी याबाबत आपले मत मांडले.

दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ पासून सुरू झालेल्या महाराष्ट्र विधिमंडळ सन २०२४ च्या द्वितीय अर्थसंकल्पीय अधिवेशनात खालील नमूद विभागांचे विधिमंडळातील कामकाज आपल्या मूळ

विभागाचे कामकाज सांभाळून त्यापुढे नेमून दिलेले मंत्री पाहतील असे मुख्यमंत्री महोदयांनी कळविले आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

१. सामान्य प्रशासन विभाग - माननीय मंत्री श्री. शंभूराज देसाई

२. नगरविकास व माहिती तंत्रज्ञान विभाग - माननीय मंत्री श्री. उदय सामंत

३. परिवहन विभाग - माननीय मंत्री श्री. दादाजी भुसे

४. सामाजिक न्याय, दिव्यांग कल्याण विभाग - माननीय मंत्री श्री. गुलाबराव पाटील

५. माहिती व जनसंपर्क विभाग - माननीय मंत्री श्री. संदिपानराव भुमरे

६. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग - माननीय मंत्री श्री.दीपक केसरकर

७. खनिकर्म विभाग - माननीय मंत्री श्री. अब्दुल सत्तार

३. उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी पुढील प्रस्ताव मांडले—

(अ) "पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

(ब) "पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २६० (४) मधील चर्चारोधाच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाले.

४. आता सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक (१) महसूल व वन विभाग (२) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (३) सार्वजनिक बांधकाम विभाग (४) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग या विभागांच्या पुरवणी मागण्या चर्चेला घेण्यात येतील तसेच विभागांच्या मागण्यांचा तपशील सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आला असून कपात सूचना देण्याची मुदत आज मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आलेली असल्याने मान्य कपात सूचनांची यादी सदस्यांना स्वतंत्रपणे वितरित करण्यात येईल असे सांगून माननीय अध्यक्षांनी चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

मागण्यावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

श्री. विजय वडेट्टीवार (विरोधी पक्ष नेते) यांनी, सन्माननीय सदस्य श्री. बाळासाहेब थोरात हे प्रथम भाषण करतील असे सांगितले.

(१) श्री. बाळासाहेब थोरात (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, 'मराठा आरक्षण आंदोलनाच्या अनुषंगाने एसआयटी स्थापन करण्याबाबत' माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला व आपले मत मांडले.

श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. व विरोधी पक्ष नेते यांनी याबाबत आपले मत मांडले.

गोंधळसदृश परिस्थितीमुळे सभागृहाची बैठक ५ मिनिटांकरिता तहकूब करण्यात येत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी १० वाजून ३६ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सकाळी १० वाजून ४१ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**माहितीविषयक मुद्दा - (पुढे सुरू)—**

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, मराठा आरक्षण आंदोलनाच्या संदर्भात एसआयटीमार्फत चौकशी करावी अशी मागणी केली.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने या प्रकरणाची एसआयटीमार्फत सखोल चौकशी करावी, असे निर्देश माननीय अध्यक्षांनी दिले.

उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी याबाबत सखोल चौकशी करण्यात येईल असे सांगितले.

**सन २०२३-२०२४ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला व शेवटचा दिवस) (चर्चा पुढे सुरू)—**

पुरवणी मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. बाळासाहेब थोरात (भाषण पूर्ण)
(२) श्री. हरिभाऊ बागडे
(३) श्री. अनिल देशमुख

(चर्चा अपूर्ण)

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, 'आदरणीय श्री. बाबा आढाव हे आझाद मैदान येथे आंदोलनास बसलेले असणे' इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

शासनाने नोंद घेतली असल्याचे सांगितले.

**सन २०२३-२०२४ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला व शेवटचा दिवस) (चर्चा पुढे सुरू)—**

पुरवणी मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(४) श्री. रमेश बोरनारे
(५) ॲड. (श्रीमती) यशोमती ठाकूर
(६) ॲड. आशिष शेलार
(७) श्री. बाबासाहेब पाटील
(८) श्री. वैभव नाईक
(९) श्री. अबु आजमी
(१०) श्री. नाना पटोले
(११) श्रीमती मनिषा चौधरी
(१२) श्री. रोहित पवार
(१३) श्री. श्रीनिवास वनगा
(१४) श्रीमती मंजुळा गावित
(१५) श्री. संजय जगताप
(१६) श्री. राम सातपुते
(१७) डॉ. किरण लहामटे
(१८) श्री. सुनील प्रभू

कृषी मंत्री, वने मंत्री, महसूल मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, कामगार मंत्री, उप मुख्यमंत्री तथा उर्जामंत्री यांनी आपापल्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

आजच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे मागण्या एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

चर्चेसाठी प्राथम्यक्रमात नसलेल्या खालील विभागांच्या पुरवणी मागण्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या :—

| | |
|---|---|
| (१) सामान्य प्रशासन विभाग | अनुक्रमांक १ व २ |
| (२) गृह विभाग | अनुक्रमांक ३ ते ७ |
| (३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | अनुक्रमांक १७ |
| (४) नगरविकास विभाग | अनुक्रमांक १८ ते २० |
| (५) वित्त विभाग | अनुक्रमांक २१ |
| (६) जलसंपदा विभाग | अनुक्रमांक २८ व २९ |
| (७) विधि व न्याय विभाग | अनुक्रमांक ३० व ३१ |
| (८) ग्रामविकास विभाग | अनुक्रमांक ३५ ते ३७ |
| (९) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | अनुक्रमांक ३८ |
| (१०) नियोजन विभाग | अनुक्रमांक ३९ ते ४२ |
| (११) सार्वजनिक आरोग्य विभाग | अनुक्रमांक ४३ |
| (१२) वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग | अनुक्रमांक ४४ व ४५ |
| (१३) आदिवासी विकास विभाग | अनुक्रमांक ४६ |
| (१४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | अनुक्रमांक ४७ व ४८ |
| (१५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग | अनुक्रमांक ४९ व ५० |
| (१६) महिला व बाल विकास विभाग | अनुक्रमांक ५१ |

| | | |
|---|---|---|
| (१७) | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग | अनुक्रमांक ५२ |
| (१८) | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | अनुक्रमांक ५३ |
| (१९) | इतर मागास बहुजन कल्याण विभाग | अनुक्रमांक ५४ |
| (२०) | दिव्यांग कल्याण विभाग | अनुक्रमांक ५५ |

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**५. विचार खंडशः विचार व संमत करणे.—**

**(१) (क) सहकार मंत्री यांनी,** सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक २—महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२४ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा, दुसरा प्रस्ताव श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा व तिसरा प्रस्ताव सर्वश्री नाना पटोले व इतर वि.स.स. आणि संग्राम थोपटे, वि.स.स. यांचे प्रस्ताव अनुक्रमे मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. विजय वडेट्टीवार (विरोधी पक्षनेते), (२) श्री. हरिभाऊ बागडे,

(३) शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील

सहकार मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(२) (क) उद्योग मंत्री (मुख्यमंत्री यांचेकरिता) यांनी,** सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ४ – मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२४ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा, दुसरा प्रस्ताव श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा व तिसरा प्रस्ताव सर्वश्री नाना पटोले व इतर वि.स.स. आणि संग्राम थोपटे, वि.स.स. यांचे प्रस्ताव अनुक्रमे मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अजय चौधरी (२) श्री. विजय वडेट्टीवार ( विरोधी पक्ष नेते),

(३) श्री. प्रकाश सुर्वे

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(३) (क) उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांनी,** सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ३ – महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२४ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा, दुसरा प्रस्ताव श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा व तिसरा प्रस्ताव सर्वश्री नाना पटोले व इतर वि.स.स. आणि संग्राम थोपटे, वि.स.स. यांचे प्रस्ताव अनुक्रमे मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चेत सदस्यांनी भाग घेतला नाही.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सभागृहाची बैठक दुपारी ०१ वाजून ३४ मिनिटांनी स्थगित झाली.
स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २-०० वाजता पुन्हा सुरू झाली.

**६.** उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी, सन २०२४-२५ चा अंतरिम अर्थसंकल्प सभागृहाला सादर केला.

सन २०२४-२०२५ चा अंतरिम अर्थसंकल्प सभागृहास सादर करण्यात आला असून अर्थसंकल्पीय प्रकाशनाचे पेनड्राईव्ह असलेल्या सूटकेसेस सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे विधान भवनाकरिता आरक्षित असलेल्या वाहनतळाच्या मोकळ्या जागेवर उभारण्यात आलेला मंडप, विधान भवन, मुंबई येथे करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी वितरणाच्या ठिकाणावरून सदर प्रकाशनांचे पेनड्राईव्ह असलेल्या सूटकेसेस प्राप्त करून घ्याव्यात. तसेच, सदर अर्थसंकल्पीय प्रकाशने महाराष्ट्र विधिमंडळाच्या व शासनाच्या संकेतस्थळावरून उपलब्ध करून देण्यात येतील असे माननीय अध्यक्षांनी घोषित केले.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून बुधवार दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११-०० वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

## बुधवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४

**१.** (१) राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचा दिनांक १ जानेवारी, २०२१ ते ३१ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्र्यांनी पुढील अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले :—

(क) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे व त्यावरील महालेखापाल (लेखापरीक्षा-१) महाराष्ट्र यांचा अलग लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील महामंडळाचे अनुपालन अहवाल.

(ख) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचे सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक लेखा अहवाल आणि त्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अलग लेखापरीक्षा अहवाल.

**२.** माननीय अध्यक्षांनी आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारल्याचे सांगितले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, ‘अवकाळी पावसामुळे विदर्भ व मराठवाड्यातील शेती पिकांचे झालेले नुकसान, मराठा समाजाचे आरक्षण तसेच पालघर जिल्ह्यातील तालुक्यातील वसई तालुक्यातील पाणी पुरवठा व स्मशानभूमी यासंदर्भात तेथील लोकांनी केलेले आंदोलन’ याबाबतच्या मुद्यांवर आपले म्हणणे मांडले.

सदरहू प्रकरणी शेतकऱ्यांच्या नुकसानीचा तक्ता मागवला असून स्टँडिंग ऑर्डरनुसार शेतकऱ्यांना निश्चितपणे तत्काळ मदत करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्ष नेता यांनी, 'एमपीएससी कृषि सेवा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नियुक्ती मिळणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केली असेल व न्यायालयाची कोणतीही अडचण नसेल तर तत्काळ अधिवेशन संपण्यापूर्वी नियुक्ती आदेश काढावेत असे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

डॉ. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, 'सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण" पुरस्काराचे वितरण मागील साडे चार वर्षांपासून करण्यात आलेले नसणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

सदरहू मुद्याबाबत मागील सरकारच्या काळातील व या सरकारच्या काळातील सर्व पुरस्कार एकत्रितपणे प्रदान करण्याच्या संदर्भात काल मुख्यमंत्री महोदयांनी बैठक घेतली असता काल 'मराठी भाषा गौरव दिनाचा कार्यक्रम' लांबल्यामुळे उक्त बैठक पूर्ण होऊ शकली नसल्यामुळे त्याकरिता मुख्यमंत्री महोदय याच आठवड्यात पुन्हा वेळ देणार आहेत व सदर बैठकीत उक्त निर्णय घेण्यात येणार आहे, असे श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री यांनी सांगितले.

डॉ. विश्वजीत कदम, वि.स.स. यांनी, 'सांगली जिल्ह्यात कालव्यातील पाण्याचे योग्य प्रकारे आवर्तन करणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सातारा आणि सांगली जिल्ह्याचे एकत्रितपणे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात येतील. उद्या कालवा सल्लागार समितीची बैठक आहे. त्यामुळे या दोन्ही जिल्ह्यांचे हित लक्षात घेऊन या संदर्भात निर्णय घेण्यात येईल, असे श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री यांनी सांगितले.

श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी, 'मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत लागलेली भीषण आग' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

हा विषय तात्काळ माननीय मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिला जाऊन त्यांच्या माध्यमातून या संदर्भातील निर्देश देण्याचे सांगण्यात येईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

श्री. रईस शेख, वि.स.स. यांचा मुद्दा—

**(प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने हिंदी भाषणातील मजकूर प्रलंबित आहे.)**

उक्त मुद्दा महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून दिला जाईल, उपमुख्यमंत्री यांनी सांगितले.

**३. (अ) पुरःस्थापनार्थ, विचार, खंडशःविचार व संमत करणे—**

सहकार मंत्र्यांनी, वित्त मंत्री यांचेकरिता सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ५ – महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२४ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकाच्या अनुषंगाने काही सन्माननीय सदस्यांनी सुधारणा दिल्या आहेत त्यांनी त्या मांडाव्यात, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी नगरविकास विभागाची पुरवणी मागणी क्र. एफ-२, शालेय शिक्षण विभागाची पुरवणी मागणी क्र. ई-२ आणि सार्वजनिक आरोग्य विभागाची मागणी क्र. आर-१ यांना सुधारणा मांडल्या व भाषण केले.

श्री. सुभाष धोटे, वि.स.स. यांनी, पर्यटन विभागाची मागणी क्र. ओ-८ व मागणी क्र. एच-५ यांना सुधारणा मांडल्या व भाषण केले.

सहकार मंत्र्यांनी, उपरोक्त विधेयकावरील सुधारणांबाबत आपले म्हणणे मांडले.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(ब) पुरःस्थापनार्थ—**

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ६ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ३७ मिनिटांनी दुपारी १२ वाजून ०५ मिनिटांपर्यंत स्थगित झाली.**

**स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ०५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.**

श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्ष नेता यांनी, सत्तारूढ व विरोधी पक्षाचा प्रस्ताव सभागृहात चर्चेला येणार असून याप्रसंगी माननीय मुख्यमंत्री व दोन्ही उप मुख्यमंत्री सभागृहात अनुपस्थित असल्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे काल कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविलेल्या सत्तारूढ पक्षाच्या प्रस्तावावरील चर्चा आता सुरू करून ती आज दुपारी ४.०० वाजेपर्यंत संपविल्यानंतर लगेच विरोधी पक्षाचा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल आणि तो प्रस्ताव ऑन लेग ठेवून त्या प्रस्तावावरील उर्वरित चर्चा उद्या सकाळी १०-०० ते ११-०० वाजेपर्यंत करून ती चर्चा संपविण्यात येईल असे कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरलेले असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. राजेश टोपे, वि.स.स. यांनी, 'भोकरदन, जाफ्राबाद व अंबड तालुक्यांमध्ये प्रचंड वादळी वाऱ्यासह मोठ्या प्रमाणावर गारपीट झालेली असून त्यामुळे वरील तीन तालुक्यांसह जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून त्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीने मदत करण्याची आवश्यकता असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

## ४. म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव–

ॲड. आशिष शेलार वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले—

"गत दीड वर्षांच्या काळात मुंबई शहरामध्ये गृहनिर्माण व गतिशील परिवहन गृहनिर्माण व गतिशील परिवहन हे मुद्दे प्राधान्याने विचारात घेऊन व विकास हाच केंद्रबिंदू मानून मुंबई शहरात स्मार्ट सिटीच्या उभारणीद्वारे स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यावर भर देऊन विकास नियोजनात्मक व कालबद्ध कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भूमी पूजन होऊन कामेही सुरू झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई शहरातील ४५० कि.मी.च्या रस्त्यांच्या क्रॉंक्रीटीकरणाची ६ हजार कोटींपेक्षा जास्त रकमेच्या कामांची निविदा काढण्यात येऊन सबंधित वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर सबंधित कामांचे भूमी पूजन मा. पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मेट्रो २ए आणि २बी ची सेवा सुरू झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर यामध्ये वाहतूक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरू केल्याने व सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणांकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एकखिडकी व कालबद्ध स्थलांतरण योजना राबविण्याची तसेच, एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणांबाबतीतील शासनाचे धोरण निश्चित करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी

गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळांच्या वसाहतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहरातील डीपी प्लॅन व रिंग रोड नव्याने तयार करण्याची आवश्यकता, पुण्यातील वाढत्या झोपडपट्ट्यांची समस्या सोडविण्यासाठी झोपडपट्टी धोरण व नियमावली करण्याची आवश्यकता, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभूत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, स्वारगेट ते कात्रज, खडकवासला ते हडपसर मेट्रो रेल्वेच्या कामाला गती देण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबईतील भेंडीबाजार, धारावी यांसारख्या गजबजलेल्या भागांचे पुनरुज्जीवन करण्याच्या दृष्टीने उभारण्यात येणारे एसबीयुटी सारखे गृहनिर्माण प्रकल्प नागरी पुनरुत्थान घडविणारे असल्याचे निदर्शनास येणे, धारावीत डीआरपीपीएलच्या माध्यमातून पुनर्विकास प्रकल्प राबविण्याचे धोरण करण्यात येणे, मुंबईतील ५६ म्हाडा वसाहतींच्या वाढीव सेवा शुल्काची अंदाजे रु. ४८४ कोटींची रक्कम माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात येणे, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरीटेज टीडीआर प्रत्यक्ष अंमलात आला असणे, स्वयं-पुनर्विकासाच्या माध्यमातून गृहनिर्माण प्रकल्प अधिक गतिमान करण्यासाठी मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणाऱ्या कर्ज मर्यादित वाढ करण्यात आली असणे, स्वयं-पुनर्विकास इमारतीतील मूळ रहिवाशांनाही स्टॅम्प ड्युटीवर सूट देण्याचा निर्णय घेण्यात येणे, स्वयं-पुनर्विकास करताना येणाऱ्या विविध अडचणी/तक्रारी सोडविण्यासाठी जिल्हास्तरीय समितीमध्ये को-ऑप. हौ. फेडरेशनच्या एका सदस्याचा समावेश करण्यात येणे, मुंबईतील ९ मीटर पेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांवरील गृहनिर्माण संस्थांनाही संपूर्ण चटई क्षेत्राचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबईतील १४ हजारांहून अधिक सेस इमारतींचे त्वरित स्ट्रक्चरल ऑडिट करून धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाला गती देण्याचा निर्णय घेण्यात येणे, सीआरझेडचा कायदा बदलून विकास कामांना गती देण्याचे धोरण आणण्याची आवश्यकता, गिरणी कामगारांना घरांसाठी पात्र करून घेण्यासाठी सर्वात मोठे अभियान राबविण्यात येणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी स्टॅम्प ड्युटी भरण्यात सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरू करण्यात येणे, ग्रामीण भागातील शबरी घरकूल योजना शहरातही राबविण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत त्या परिसरातील अनिवासी झोपडीधारक, स्टॉलधारक यांची पात्रता निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु असणे, एमएसआरडीसीच्या माध्यमातून वांद्रे रेक्लमेशन येथील २१ एकर भूखंडाचा पुनर्विकास प्रस्तावित असणे, मुंबईतील म्हाडाच्या ३८८ पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकासासाठी व म्हाडा

वसाहतीत राहाणाऱ्या रहिवाशांच्या ३५ मागण्यांपैकी १६ मागण्यांबाबत सुधारित शासन निर्णय जारी करण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसनामधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, मुंबईतील झोपडपट्ट्यांचे निर्मूलन करण्याकरिता व धोकादायक इमारतीतील रहिवाशांचे हक्काचे घर मिळविण्याचे स्वप्न साकार करण्याकरिता क्लस्टर विकासाच्या माध्यमातून विविध पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासामधील भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, म्हाडाकडून पुनर्विकास होणाऱ्या इमारतीतील रहिवाशांना तसेच, झोपडीधारकांना विकासकाविरुद्ध महारेरामध्ये अपील करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना केलेल्या कराराप्रमाणे तेथील भाडेकरूंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत बऱ्याच विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, पुनर्विकास करावयाच्या इमारतींचा तात्काळ विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील नेहरुनगर व टिळक नगर म्हाडा वसाहतीतील पुनर्विकसित इमारतींना १० ते १५ वर्षे उलटूनही अद्याप भोगवटा प्रमाणपत्र ( ओसी ) न मिळणे, जिल्हाधिकाऱ्यांच्या हद्दीतील जमिनींवरील धारणाधिकार रुपांतरीत करण्याकरिता आकारण्यात येणारे शुल्क जीर्ण इमारतींच्या बाबतीत २.५ टक्के करण्याची आवश्यकता, पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी दीर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच, म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, मुंबईतील २१ मंड्यांचा पुनर्विकास प्रगतिपथावर असून त्यापैकी दोन मंड्यांचे बांधकाम पूर्ण, ६ मंड्यांचे बांधकाम पूर्णत्वाकडे व ७ मंड्यांचे आराखडे मंजुरीसाठी सादर असणे, मुंबई मेट्रो लाईन-३ या प्रकल्पाची मार्गिका धारावी येथून जाणार असल्याने त्याकरिता येथील ३,३०८ चौ.मी. इतका भूखंड एमएमआरडीएकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात येणे, ठाणे-बोरिवली भुयारी मार्गाची निर्मिती करण्याचे धोरण प्रस्तावित असणे, वाशी येथील सध्याच्या २ खाडी पुलांना समांतर अशा तिसऱ्या ६ पदरी खाडी पुलाच्या प्रकल्पाचे काम सुरू असणे, मुंबई-पुणे मिसींग लिंक या ६,७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम सुरू असणे, या सर्व प्रकल्पांमुळे वाहतूक कोंडी सुटेल व अपघातांचे प्रमाण कमी होईल तसेच, इंधन व वेळेची बचत होऊन प्रदूषणात घट होईल हे उद्दिष्ट असणे, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूची निर्मिती, शिवडी ते न्हावा-शेवा या मुंबई पारबंदर प्रकल्पाची निर्मिती यामुळे मुंबईतील वाहतूक सेवा सुलभ होणे, भिवंडी-कल्याण-शीळफाटा रस्त्याच्या सहापदरी रुंदीकरणाच्या कामासाठी ५६१.८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, देवनार डंपिंगमध्ये वनस्पतीजन्य सुगंधी फवारणीकरून त्या भागातील प्रदूषण व दुर्गंधी कमी करण्यात येणे, मुंबईकरांचा प्रवास वेगवान करण्याकरिता निर्माण करण्यात आलेल्या कोस्टल रोडचे काम अंतिम टप्प्यात असणे, मुंबई व उपनगरातील ठाणे-कल्याण इत्यादी भागातील

झोपडपट्ट्यांचे समूळ उच्चाटन करून व पायाभूत सुविधा उभारून पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने केलेली व अधिक गतीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी.”

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

| | |
|---|---|
| (१) प्रा. वर्षा गायकवाड | (२) श्री. मंगेश कुडाळकर |
| (३) श्री. संजय केळकर | (४) श्री. अमिन पटेल |
| (५) श्री. प्रकाश सुर्वे | (६) श्री. रोहित पवार |
| (७) श्री. रईस शेख | (८) श्री. अमित साटम |
| (९) श्री. झिशान सिद्दीकी | (१०) श्रीमती यामिनी जाधव |
| (११) श्री. सुनील टिंगरे | (१२) डॉ. भारती लव्हेकर |
| (१३) श्री. सुनील प्रभू | (१४) श्री. नितेश राणे |
| (१५) श्री. दिलीप लांडे | (१६) श्री. अबु आझमी |
| (१७) श्रीमती मंदा म्हात्रे | (१८) श्रीमती मनिषा चौधरी |

(भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण)

तालिका सभाध्यक्षांनी पुढील घोषणा केली—

“मला सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यास अत्यंत आनंद होतो की, आज आपल्या सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी Mr. Derek Walker, Future Generations Commissioner, Wales व अन्य उच्चाधिकारी यांचे शिष्टमंडळ विशेष अभ्यागत कक्षामध्ये उपस्थित आहे. आपण सर्व जण त्यांचे टाळ्यांच्या गजरात हार्दिक स्वागत करूया. I welcome Mr. Derek Walker, Future Generations Commissioner, Wales and other members of the Delegation to this August House.”

**म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव— (चर्चा पुढे सुरू)**

‘मुंबई व पुणे महानगर प्रदेशामध्ये होत असलेल्या विविध विकास कामांबाबत’ या विषयावर ॲड. आशिष शेलार व इतर वि.स.स. यांनी म.वि.स. नियम २९३ अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१९) श्रीमती मनिषा चौधरी, (२०) श्री. कालिदास कोळंबकर,

(२१) कॅप्टन आर.तमिल सेल्वन (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

**५. म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव—**

श्री.अनिल देशमुख, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले—

"शेतकरीविरोधी धोरण व नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यातील शेतकरी अस्मानी व सुलतानी संकटात सापडला असणे, सोयाबीन, कापूस इ. कृषी मालाची खरेदी हमीभावापेक्षा कमी दराने होत असणे, तक्रार करूनही कारवाई न करता व्यापाऱ्यांना पाठीशी घातले जाणे, सीसीआयच्या जाचक अटींमुळे शेतकऱ्यांचा कापूस अद्याप विकला न जाणे, केंद्र सरकारच्या आयात-निर्यात धोरणातील धरसोडपणामुळे अनेक शेतीमालाचे दर पडले असणे, निर्यातबंदी करून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करून कर्जबाजारी करणे, कीडरोग प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात शासनाला आलेले अपयश, ड्रॅगन फ्रूट फळ पीक अनुदानात वाढ करण्याची आवश्यकता, संत्रा, सीताफळ, पेरू, काजू यांसारख्या फळप्रक्रिया उद्योगांना बळ देण्याबाबत शासनाची नकारात्मक भूमिका, पीकविमा कंपन्यांमार्फत शेतकऱ्यांची होणारी लूट, त्यामुळे पीक विमा योजना प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांना थेट लाभ मिळवून देण्याची होत असलेली मागणी, अवकाळी पाऊस व गारपिटीने भाजीपाला, गहू, धान, हरभरा, तूर, ज्वारी, बाजरी इत्यादी पिकांचे तसेच आंबा, काजू, संत्रा, केळी, पानपिंपरी या फळबागांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, धानाला घोषित झालेला २० हजार रुपयांचा बोनस अद्याप न मिळणे, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यात ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान जमा न होणे, दुधाचे पडलेले दर तसेच दुधाला ५ रुपये अनुदानाची घोषणा हवेत विरणे, छत्रपती शिवाजी महाराज कृषी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी न करणे, राज्यात शेततळ्यांचे उद्दिष्ट पूर्ण न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये पसरलेले नैराश्य, शेतकरी आत्महत्या रोखण्यास शासनास आलेले अपयश, राज्यातील धरणांमध्ये विशेषतः विदर्भ व मराठवाड्यात पाणीसाठा कमी असल्यामुळे तसेच भूजल पातळी कमी असल्याने निर्माण होत असलेली भीषण पाणी टंचाई, राज्यात निर्माण झालेल्या कायदा सुव्यवस्थेच्या गंभीर प्रश्नामुळे जनतेमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, पत्रकार निखिल वागळे व सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी यांच्यावर झालेले भ्याड हल्ले, विद्यमान विधानसभा सदस्यांनी पोलीस ठाण्यात केलेला गोळीबार, दहिसर येथे माजी नगरसेवकाची करण्यात आलेली हत्या, महिला व लहान

बालिकांवरील लैंगिक अत्याचाराने गाठलेला कळस, खून, बलात्कार, दरोडे, सायबर बुलिंग, सायबर क्राईमच्या गुन्ह्यांमध्ये झालेली भरमसाठ वाढ, परिणामी राज्याची प्रतिमा मलिन होत असणे, राजकीय नेत्यांकडे गुंडांचा वावर वाढला असून पुण्यातील कुख्यात गुंडाने मंत्रालयात घेतलेल्या भेटीमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, तडीपार गुंडांचा राज्याच्या मुख्यालयात राजरोजसपणे सुरू असलेला वावर, पोलिसांच्या पत्नीचा अपमान होईल असे अशोभनीय वक्तव्य सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधीकडून करण्यात आल्याने जनतेमध्ये पसरलेला तीव्र संताप, राज्यात ऑर्केस्ट्रॉच्या नावाखाली सर्रासपणे अवैधरित्या डान्सबार सुरू असणे, मुंबई पोलीस दलात व राज्यात पोलिसांची हजारो पदे रिक्त असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, पोलिसांवर पडत असलेला अतिरिक्त ताण, मराठा, ओबीसी, मुस्लिम, लिंगायत, धनगर समाजाच्या आरक्षणप्रश्नी नागरीकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करून आरक्षणावरून समाज-समाजामध्ये तेढ निर्माण करणे, राज्यात अंमली पदार्थांचा झालेला सुळसुळाट, गुटखा, विदेशी सिगारेट, ई-सिगारेट व तत्सम बंदी असलेल्या पदार्थांची बेकायदेशीररित्या ठिकठिकाणी सुरू असलेली विक्री, आदिवासी बांधवांपर्यंत योजना पोहोचविण्यास शासनास आलेले अपयश, शासनाच्या विविध विभागात होत असलेला भ्रष्टाचार, प्रिन्सेस स्ट्रीट ते वांद्रे-वरळी या प्रकल्पाचे काम अपूर्ण असतानाही किनारा मार्ग खुला करण्याचा अट्टाहास करण्यात येणे, मुंबई MMR क्षेत्रातील प्रकल्प वेळेत पूर्ण न करता अनेक प्रकल्पांच्या किंमती वाढवून छुप्या पद्धतीने केला जात असलेला गैरव्यवहार, जल जीवन मिशन योजनेमध्ये ठाणे, रायगड, पालघर, नगर व इतर जिल्ह्यात झालेली अनियमितता, राज्यातील अंगणवाडी सेविका व आशा वर्कर्सच्या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष करणे, अंगणवाडी सेविकांकरिता घेण्यात आलेल्या मोबाईलमध्ये झालेला कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार तसेच अंत्योदय योजनेतील साडी वाटपात झालेला गैरव्यवहार, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाची नियमबाह्य फेररचना व मुख्य अभियंता विद्युत हे पद नियमबाह्यरित्या निरसित करणे, तसेच प्रेसिडेन्सी डिव्हिजन मध्ये होत असलेला भ्रष्टाचार, प्रचंड विरोध असतानाही केवळ कंपन्यांच्या फायद्यासाठी स्मार्ट मीटर योजना सर्वसामान्यांच्या माथी मारणे, सार्वजनिक आरोग्य विभागात औषधांची खरेदी तसेच उपकरणांच्या खरेदीत झालेला भ्रष्टाचार, प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यास राज्य शासनास आलेले अपयश, उल्हासनगर महानगरपालिकेत झालेला करोडो रूपयांचा भ्रष्टाचार, देवस्थान जमिनींची बेकायदेशीररित्या सुरू असलेली विक्री, भूसंपादन प्रक्रियेत झालेले गैरव्यवहार, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डात झालेला भ्रष्टाचार, मिठागरे बुजवून बांधकामांना परवानगी दिल्याने पर्यावरणाचा निर्माण झालेला प्रश्न, निधीवाटपात करण्यात येत असलेला पक्षपातीपणा, पश्चिम विदर्भात सिंचनाचा अनुशेष असणे, पूर्व विदर्भात खारपाण पट्ट्यात असलेला सिंचनाचा अभाव व त्यामुळे येथे खारपाण विकास महामंडळ स्थापन होण्याची

आवश्यकता, स्थानिकांचा विरोध असताना देखील नागरीकांचा विरोध डावलून वाढवण बंदर प्रकल्प पूर्ण करण्याकडे घातलेला घाट, मुंबई-गोवा महामार्गाचे काम दहा वर्षांपासून रखडले असल्याने न्यायालयाने शासनाला फटकारणे, राज्यातील शहरांत फूटपाथ नसल्यामुळे गेल्या तीन वर्षांत सुमारे ८ हजार पादचाऱ्यांचा झालेला मृत्यू, राज्यात वाढत असलेल्या बेकायदा बांधकामांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, पर्ससीन नेट तसेच एलईडी लाईटच्या वापरामुळे सागरी किनारपट्टी भागात मत्स्यदुष्काळाची परिस्थिती निर्माण होणे, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला जाणे, महानंद दूध डेअरी एन.डी.बी.बी.कडे हस्तांतरित करून गुजरातच्या दावणीला बांधण्याचा घाट घालणे, गेल्या दशकभरात उद्योगधंद्यात झालेली अधोगती, विविध भरती प्रक्रियेत उघडकीस आलेला आर्थिक गैरव्यवहार, तलाठी भरती प्रक्रियेत झालेली पेपरफुटी व गैरव्यवहार, चुकीच्या वाळू धोरणामुळे शासकीय महसुलाचे झालेले नुकसान व वाळू माफियांकडून चढ्या दराने वाळू विक्री केल्याने सर्वसामान्य जनतेची होणारी लूट, विविध विभागात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असताना भरती प्रक्रिया रखडल्या असताना कंत्राटी पद भरती करून आरक्षण संपविण्याकडे सरकारचा कल, भाप्रसे अधिकाऱ्यांच्या जागेवर कनिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्यामुळे भाप्रसे अधिकाऱ्यांचे होत असलेले खच्चीकरण, विविध यंत्रणांकडून चौकशी सुरू असलेल्या अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या ठिकाणी नियुक्ती दिल्यामुळे प्रशासनाचा उडालेला बोजवारा, बनावट दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन नोकरी व पदोन्नती मिळविलेल्या उमेदवारांवर ठोस कारवाई न करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात सरकारला आलेले अपयश व त्यामुळे राज्याचे झालेले नुकसान, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्रीमती मनिषा चौधरी, (२) कु. प्रणिती शिंदे,
(३) श्री. कैलास पाटील (घाडगे), (४) श्री. आशुतोष काळे,
(५) ॲड. आशिष शेलार (भाषण अपूर्ण).

(चर्चा अपूर्ण)

माननीय तालिका सभाध्यक्षांनी पुढील घोषणा केली—

"सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यास अत्यंत आनंद होतो की, आज आपल्या सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी मिस्टर बेरेक वल्कर, हिचर जनरेशन कमिशनर, वेल्स माननीय

उच्चाधिकारी यांचे शिष्टमंडळ विशेष अभ्यागत कक्षामध्ये उपस्थित आहे. आपण सर्वांनी त्यांचे टाळ्यांच्या गजरात हार्दिक स्वागत करुया.”

**म.वि.स.नियम २९३ अन्वये प्रस्ताव– (चर्चा पुढे सुरू)**

‘राज्य सरकारचे जनता व शेतकरी यांच्याशी निगडीत विविध समस्यांकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष’ या विषयावर सर्वश्री विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. यांनी म.वि.स. नियम २९३ अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली—

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(५) ॲड. आशिष शेलार (भाषण पूर्ण)
(६) श्री. संजय जगताप
(७) श्री. संजय गायकवाड
(८) श्री. रोहित पवार
(९) श्री. संजय केळकर
(१०) सहसराम कोरोटे
(११) श्री. वैभव नाईक
(१२) डॉ. भारती लव्हेकर
(१३) श्री. सुनील भुसारा
(१४) श्री. विक्रमसिंह सावंत
(१५) श्री. सुनील प्रभू
(१६) श्री. अशोक पवार
(१७) श्री. प्रताप अडसड
(१८) श्री. पी.एन.पाटील(सडोलीकर)
(१९) ॲड. आकाश फुंडकर
(२०) श्री. अमित झनक
(२१) डॉ. विश्वजित कदम

(चर्चा अपूर्ण)

**गुरुवार, दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४**

**१. सचिव (१) (कार्यभार) यांनी** अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २२० ते २३० सभागृहासमोर ठेवली.

**२.** (१) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी, नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला. २) राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, अ) महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल तसेच ब) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा अठ्ठावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले. ३) उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्य मंत्र्यांनी, (क) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे वैधानिक लेखा परीक्षण अहवाल, (ख) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२२-२०२३

या वर्षांचे वार्षिक लेखापरीक्षण अहवाल, (ग) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल. (घ) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा तेहतीसावा वार्षिक अहवाल,(ङ) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह),(च) विधानसभेच्या सन २०२३ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक ७ डिसेंबर, २०२३ ते दिनांक २० डिसेंबर, २०२३ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ३९५ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १५४ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवले. ४) राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, कोकण विकास महामंडळ, मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्र्यांनी पुढील प्रस्ताव मांडला.—

"अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २४६(१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**४. (१) पुरःस्थापनार्थ –**

सहकार मंत्र्यांनी, सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ७ – महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**(२) विधान परिषदेने संमत केल्याप्रमाणे, विचार, खंडशः विचार व संमत करणे–**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक १ महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन ) अधिनियम, २००३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.
विधेयकावरील चर्चेत डॉ. राजेश टोपे, वि.स.स. यांनी भाग घेतला.
उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर विधेयक संमत झाले.

**(३) विचार, खंडशः विचार व संमत करणे—**

**(क) सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ६ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४ –**

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ६ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचा पहिला प्रस्ताव, सर्वश्री अस्लम शेख, नाना पटोले, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखडे, विकास ठाकरे, शिरिष चौधरी, वि.स.स., यांचा दुसरा प्रस्ताव व श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नवरील चर्चेत डॉ. राजेश टोपे, वि.स.स. यांनी भाग घेतला.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ६ संमत झाले.

**(४) (अ) संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी वाढविण्यासंबंधी कृषी मंत्र्यांचा प्रस्ताव—**

कृषी मंत्र्यांनी पुढील प्रस्ताव मांडला.—

"(१) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४०– महाराष्ट्र (भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता) शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी विधेयक, २०२३ (२) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - कीटकनाशके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ (३) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ - बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ (४) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ - अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ (५) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४—महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले,

औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृक्‌श्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२३, यावर विचार करण्याकरिता दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी नेमण्यात आलेल्या संयुक्त समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी नेमून दिलेली मुदत विधानसभेच्या पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढविण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते यांनी, "माननीय मुख्यमंत्री महोदयांची निवेदनांवरील खोटी स्वाक्षरी व शिक्के," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपमुख्यमंत्र्यांनी ही बाब गंभीर असून सरकारने त्या संदर्भातील कार्यवाही सुरू केली असल्याचे सांगितले.

(ब) संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी वाढविण्यासंबंधी कामगार मंत्र्यांचा प्रस्ताव—

उपमुख्यमंत्र्यांनी पुढील प्रस्ताव मांडला.—

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) आणि महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२३" यावर विचार करण्यासाठी दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत विधानसभेच्या पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढविण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

५. सन २०२४-२०२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते (२) श्रीमती मंदा म्हात्रे

श्री. राम कदम, वि.स.स. यांनी, "श्री. अजय पनवेलकर यांनी त्यांच्या मोबाईलवर व्हायरल होऊन आलेल्या चित्रफितीबाबत सांताक्रूझ पोलीस स्टेशनमध्ये नोंदवलेली तक्रार" इ. बाबत माहितीचा

मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याची गंभीरपणे दखल घेऊन सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

**सन २०२४-२०२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला व शेवटचा दिवस) - (चर्चा पुढे सुरू)**

अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) डॉ. राजेश टोपे
(२) श्री. कैलाश पाटील
(३) श्रीमती मनिषा चौधरी
(४) डॉ. नितीन राऊत
(५) श्री. शेखर निकम

श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, "भिवंडी शहरामध्ये मौजे कणेरी, सर्वे क्र. २६ या जागेवर मुस्लिम कब्रस्तानचे काम सुरू असणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

**सन २०२४-२०२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला व शेवटचा दिवस) - (चर्चा पुढे सुरू)**

अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(८) ॲड. आशिष जैस्वाल

डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांनी, "वीज कंपन्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी, असे निर्देश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

**सन २०२४-२०२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला व शेवटचा**

**दिवस) – (चर्चा पुढे सुरू)**

अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. जयंत पाटील
(२) श्रीमती सीमा हिरे
(३) श्री. अमिन पटेल
(४) श्री. दत्तात्रय भरणे
(५) श्री. सुनील प्रभू

(१) श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी, "भिवंडीमध्ये १४ फेब्रुवारी, २०२४ रोजी वरालदेवी नगरमधील संकेत भोसले नावाच्या १६ वर्षांच्या तरुणाची झालेली हत्या," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे निर्देश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी, नोंद घेतली असल्याचे सांगितले.

(२) श्रीमती वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, "१३४ पोलीस उपनिरीक्षकांना पदोन्नती देणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**सन २०२४-२०२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला व शेवटचा दिवस) – (चर्चा पुढे सुरू)**

अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१४) श्री. अबु आजमी
(१५) डॉ. संजय रायमुलकर
(१६) श्री. किशोर जोरगेवार
(१७) श्रीमती मोनिका राजळे
(१८) प्रा. श्रीमती वर्षा गायकवाड
(१९) श्री. राजेश पवार
(२०) श्री. प्राजक्त तनपुरे
(२१) श्री. आशुतोष काळे
(२२) श्री. रईस शेख
(२३) डॉ. विनय कोरे
(२४) श्री. विक्रमसिंह सावंत
(२५) डॉ. भारती लव्हेकर

(२६) श्री. सुनील भुसारा
(२७) श्रीमती गीता जैन
(२८) श्री. लहु कानडे
(२९) श्री. नामदेव ससाणे
(३०) श्री. रोहित पवार
(३१) श्री. उदयसिंग राजपूत
(३२) डॉ. किरण लहामटे
(३३) श्री, नाना पटोले
(३४) श्री. अशोक पवार
(३५) श्री. अमित झनक
(३६) श्री. प्रताप अडसड
(३७) श्री. अतुल बेनके
(३८) श्रीमती श्वेता महाले

श्री. अतुल बेनके, वि.स.स. यांनी, "शेतकऱ्यांच्या पाणीपट्टी दरामध्ये १० पट वाढ करण्याची एमडब्ल्यूआरआरए या संस्थेने केलेली शिफारस," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शेतकऱ्यांच्या पाणीपट्टीचा दर कायम ठेवला जाईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**सन २०२४-२०२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला व शेवटचा दिवस) - (चर्चा पुढे सुरू)**

अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. सुनील कांबळे
(२) ॲड. आकाश फुंडकर

***

(३) श्री. सुनील शेळके

**शुक्रवार, दिनांक १ मार्च, २०२४**

**१.** सचिव-१ (कार्यभार) यांनी, अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २३१ ते २३६ सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**२.** (१) संसदीय कार्य मंत्र्यांनी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) संसदीय कार्ये मंत्र्यांनी, "हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे जन्मस्थळ असलेल्या खेड येथील वाड्याचे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे." या विषयावरील श्री.दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी झालेल्या म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल, सभागृहासमोर ठेवला.

(३) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी पुढील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवले—

(क) सन २०१९-२०२० चा महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील एकोणपन्नासावा लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल,

(ख) सन २०२०-२०२१ चे ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ पालघर/ नाशिक/ धुळे/ नंदुरबार/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ सातारा/ सांगली/ सोलापूर/ कोल्हापूर/ औरंगाबाद/ जालना/ परभणी/ हिंगोली/ बीड/ नांदेड/ उस्मानाबाद/ लातूर/ अमरावती/ अकोला/ वाशिम/ बुलढाणा/ यवतमाळ/ नागपूर/ वर्धा/ भंडारा/ गोंदिया/ चंद्रपूर व गडचिरोली या ३४ जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल .

**३.** सचिव-१ (कार्यभार) यांनी, विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केलेल्या ४ विधानसभा विधेयकांची नावे, विधानपरिषदेने कोणत्याही शिफारशीशिवाय परत केलेल्या १ विधानसभा विधेयकाचे नाव तसेच राज्यपालांची अधिसंमती मिळालेल्या २ विधानसभा विधेयकांची नावे वाचून दाखविली.

**४.** आज प्राप्त झालेल्या स्थगन प्रस्तावांच्या सर्व सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी घोषित केले.

**५.** सन २०२४-२०२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस श्री. अजित पवार,

उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी उत्तर दिले.

श्रीमती यशोमती ठाकूर, वि.स.स. यांनी, 'कौंडण्यपूर, मोझरी व संत गाडगेबाबा यांच्या नावाने वलगाव विकास आराखडा येथील २०१४ पूर्वी बांधकाम झालेल्या इमारतीचे हस्तांतरण, फर्निचरचे व आराखड्याचे कम्पलिशन सर्टीफिकेट देणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

**सन २०२४-२०२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (चर्चा पुढे सुरु )**

सन २०२४-२०२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या अंती श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्ष नेता यांनी उत्तरादाखल भाषण केले.

सन २०२४-२०२५ च्या अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा समाप्त झाल्याचे माननीय अध्यक्षांनी घोषित केले.

**६.** श्री.अजित पवार (उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम २६२ अन्वये सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाच्या भागाच्या अंदाजित खर्चासाठी लेखानुदानाचा खालील प्रस्ताव या सभागृहासमोर सादर केला.

"सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षाच्या भागाच्या अंदाजित खर्चासाठी अनुसूचीत दर्शविलेल्या शीर्षाप्रमाणे व मागण्यांप्रमाणे १ लक्ष ९९ हजार ७३० कोटी ११ लक्ष ९६ हजार रुपये यापेक्षा अधिक होणार नाही इतकी रक्कम राज्यपालांना आगाऊ मंजूर करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**७. (१) पुरःस्थापनार्थ, विचार, खंडशःविचार व संमत करणे—**

श्री. अजित पवार (उपमुख्यमंत्रीी तथा वित्त मंत्री) यांनी, सन २०२४ चे वि. स. विधेयक क्रमांक ८- महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०२४ सभागृहाला सादर केले व विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांनी, 'दिल्ली येथे शिक्षणासाठी जाणाऱ्या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची व्यवस्था करणेबाबत पुढील अंदाजपत्रकात तरतूद करणे आणि बिहार येथील बोधगया येथे मोठ्या प्रमाणात बौद्ध समाजाचे लोक जात असतात. त्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यासाठी तेथे महाराष्ट्र भवन निर्माण करण्यासाठी पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवश्यक ती तरतूद

करणे इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. नाना पटोले , वि.स.स. यांनी, 'सन २०२४ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्नोत्तराचा तास न घेणे इ. बाबत मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

माननीय अध्यक्षांनी उक्त मुद्याबाबत खुलासा केला.

७. (२) विचार, खंडशःविचार व संमत करणे—

सहकार मंत्र्यांनी, सन २०२४ चे वि. स. विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ सभागृहाला सादर केले व विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव, सर्वश्री अस्लम शेख, नाना पटोले, अमिन पटेल, विकास ठाकरे, सुभाष धोटे, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, शिरीषदादा चौधरी,वि.स.स. यांचा तिसरा प्रस्ताव अनुक्रमे मांडण्यात आले नाहीत.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत श्री. बाळासाहेब पाटील, वि.स.स. यांनी भाग घेतला-

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(२) पुरःस्थापनार्थ—**

(अ) उद्योग मंत्र्यांनी, (मुख्यमंत्री यांच्याकरिता) सन २०२४ चे वि.स.विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक,२०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(ब) कामगार मंत्र्यांनी, सन २०२४ चे वि.स.विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (सुधारणा) विधेयक,२०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**(३) विचार, खंडशःविचार व संमत करणे—**

उद्योग मंत्र्यांनी, (मुख्यमंत्री यांच्याकरिता) सन २०२४ चे वि.स.विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, सभागृहाला सादर केले व विधेयक विचारात घेण्यात

यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्ष नेता (२) श्री. भास्कर जाधव

(भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण)

**सन्माननीय सदस्य श्री. महेंद्र थोरवे व श्री.दादाजी भुसे, माननीय मंत्री यांच्यामध्ये सभागृहाबाहेर झालेली धक्काबुक्की या संबंधी—**

श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, 'सन्माननीय सदस्य श्री. महेंद्र थोरवे व श्री. दादाजी भुसे, माननीय मंत्री यांच्यामध्ये सभागृहाबाहेर झालेली धक्काबुक्की इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

**शासकीय विधेयके- (चर्चा पुढे सुरु)—**

(३) विचार, खंडशःविचार व संमत करणे—

सन २०२४ चे वि.स.विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयकावरील चर्चा पुढे सुरु झाली.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) ॲड. आशिष शेलार (२) श्री. प्राजक्त तनपुरे

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**बेस्ट प्रशासनाने केलेली तिकीट दरवाढ तसेच महानगरपालिकेकडून सीबीओ तत्त्वावरील शौचालयांना देण्यात आलेली नोटीस—**

प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. यांनी, बेस्ट प्रशासनाने केलेली तिकीट दरवाढ तसेच महानगरपालिकेकडून सीबीओ तत्त्वावरील शौचालयांना देण्यात आलेली नोटीस इ.बाबत मुद्दा उपस्थित करून आपले सविस्तर म्हणणे मांडले.

सदर प्रकरणी चौकशी करून निर्णय घेण्यात येईल, असे कामगार मंत्र्यांनी सांगितले.

श्री. बच्चू कडू, वि.स.स. यांनी, सभागृहातील कामकाज सुरु असताना एक सन्माननीय सदस्य वेलमधून फिरत असल्यामुळे माननीय अध्यक्षांनी संबंधित सदस्यांना योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी विनंती माननीय तालिका सभाध्यक्षांना केली.

सर्व सन्माननीय सदस्यांनी यापुढे याबाबत योग्य ती काळजी घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**शासकीय विधेयके- (चर्चा पुढे सुरु)-**

**(३) विचार, खंडशःविचार व संमत करणे—**

कामगार मंत्र्यांनी, सन २०२४ चे वि.स.विधेयक क्रमांक १०- महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (सुधारणा) विधेयक सभागृहाला सादर केले व विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांनी 'सन १९९० च्या दशकातील राज्यातील सेवायोजन कार्यालय बंद पडल्यामुळे बेरोजगार तरूण आर्थिक मदतीपासून वंचित असणे इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित करून आपले सविस्तर म्हणणे मांडले.

माननीय तालिका सभाध्यक्षांनी," 'सामना'वर्तमानपत्राच्या अग्रलेखातून विधानमंडळाचा 'चोरमंडळ' असा उल्लेख करण्यात येणे व माननीय विधानसभा अध्यक्षांचा अवमान करणारी भाषा वापरणे " इ.बाबत श्री. राम कदम, वि.स.स. यांनी श्री.उद्धव ठाकरे, माजी मुख्यमंत्री तथा वि.प.स. आणि श्री.संजय राऊत, खासदार यांच्याविरुद्ध विशेषाधिकारभंगाची सूचना दिली असल्याचे सांगून त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे , असे सांगितले.श्री. राम कदम, वि.स.स. यांनी उपरोक्त सूचनेबाबत आपले म्हणणे थोडक्यात मांडले.सदरहू हक्कभंगाचा प्रस्ताव तपासून त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

८. राज्य सरकारचे जनता व शेतकरी यांच्याशी निगडीत विविध समस्यांकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष'या विषयावर सर्वश्री विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३

अन्वये प्रस्ताव- (चर्चा पुढे सुरु)-

उपरोक्त प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री. विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेता

(चर्चा अपूर्ण)

९. कौशल्य विकास व उद्योजकता मंत्र्यांनी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या प्रक्रियेमध्ये आदिवासींनी प्रशिक्षण घेतलेल्या लाभाच्या वितरणात झालेल्या अनियमिततेसंबंधी गठित केलेल्या समितीचा अहवाल सादर केला.

अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

'राज्य सरकारचे जनता व शेतकरी यांच्याशी निगडीत विविध समस्यांकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष'या विषयावर सर्वश्री विजय वडेट्टीवार व इतर. वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३अन्वये प्रस्ताव- (चर्चा पुढे सुरु)-

उपरोक्त प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(२) श्री. राजेश टोपे
(३) श्री. बच्चू कडू
(४) श्री. सुरेश वरपुडकर
(५) श्रीमती ऋजुता लटके
(६) श्री. नाना पटोले
(७) डॉ. जितेंद्र आव्हाड

माननीय मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेच्या उत्तरादाखल भाषण केले.

सभागृहाने दोन्ही प्रस्तावांवर विचार केला असल्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

९. (१) मुख्यमंत्र्यांनी, 'सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना 'इ.बाबत म.वि.स.नियम ४७ अन्वये सभागृहापुढे निवेदन केले.

(२) इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी, 'धनगर समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना 'इ.बाबत म.वि.स.नियम ४७ अन्वये सभागृहापुढे निवेदन केले.

(३) गृहनिर्माण मंत्र्यांनी, 'अभ्युदय नगर येथील म्हाडा इमारतींचा पुनर्विकास'इ.बाबत म. वि.स.नियम ४७ अन्वये सभागृहापुढे निवेदन केले.

(१) श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे, वि.स.स. यांनी, 'राज्यातील १८ ते ४० वयोगटातील अनेक तरूण मुलांनी मराठा आंदोलनात सहभाग घेतल्यामुळे त्यांच्यावर आंदोलनादरम्यान गुन्हे दाखल होणे'इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(२) श्रीमती गीता जैन, वि.स.स. यांनी, 'मिरा-भाईंदर मतदारसंघातील उत्तन येथे अधिकृत कागदपत्रे नसलेल्या ८ विदेशी नागरीकांना पकडण्यात येणे'इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

ॲड.आशिष शेलार, वि.स.स.यांनी,'दिनांक १ मार्च, २०२४ पासून मुंबई शहरात बेस्ट बसेसच्या मासिक पासमध्ये केलेली भरमसाठ दरवाढ होणे. 'इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय अध्यक्षांनी, सत्र कालावधीतील कामकाजाचा संक्षिप्त आढावा घेणारा गोषवारा वाचून दाखविला व या अधिवेशनात केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

माननीय अध्यक्षांनी, पुढील अधिवेशनासंबंधी पुढील घोषणा केली.

" महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक १० जून २०२४ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे, अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे."

माननीय अध्यक्षांनी, सत्र समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा पुढील संदेश वाचून दाखविला—

"भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२) उप खंड (क) द्वारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून याद्वारे शुक्रवार, दिनांक १ मार्च २०२४ रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

यानंतर 'राष्ट्रगीत' म्हणण्यात आले.

विधानसभेचे सत्र सायंकाळी ०५ वाजून ३५ मिनिटांनी संस्थगित झाले.

***

## विवरण क्रमांक - ८

महाराष्ट्र विधानसभेच्या नियम ८ (१) अन्वये मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी नामनिर्देशित केलेली सभाध्यक्षांची तालिका :—

| | |
|---|---|
| (१) | श्री. योगेश सागर, वि.स.स. |
| (२) | श्री. दिपक चव्हाण, वि.स.स. |
| (३) | श्री.अमिन पटेल, वि.स.स. |

***

## विवरण क्रमांक -९

## विविध समित्यांवर/संस्थांवर/मंडळांवर/विद्यापीठांवर सदस्यांची निवडणूक व नामनियुक्ती

**निरंक**

***

## विवरण क्रमांक - १०

## विविध समित्यांच्या बैठकी

| अ.क्र. | समितीचे नाव | बैठकीचा वार व दिनांक | बैठकीत झालेले कामकाज |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | कामकाज सल्लागार समिती | मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ | **विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजी दोन्ही सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर कक्ष क्रमांक ०४०, तळ मजला, विधान भवन, मुंबई येथे झाली.** सदरहू बैठकीत समितीने सन २०२४ च्या व्दितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनासंबंधात संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या दिनदर्शिकेवर विचारविनिमय करून **सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी ते शुक्रवार, दिनांक १ मार्च, २०२४ पर्यंतचे सभागृहाचे कामकाज सोबत जोडल्याप्रमाणे असावे असे ठरविले व पुढील निर्णय घेण्यात आले :-**<br><br>**: : निर्णय : :**<br><br>(१) कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत विधान भवन, मुंबई येथे होणाऱ्या सन २०२४ च्या व्दितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील कामकाज सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ ते शुक्रवार, दिनांक १ मार्च, २०२४ पर्यंत निश्चित करण्यात आले.<br><br>(२) या अधिवेशनात लक्षवेधी सूचना, प्रश्नोत्तरे, अशासकीय ठराव, अशासकीय विधेयके, अर्धा-तास चर्चा यांसारख्या संसदीय आयुधांमार्फत होणारे कामकाज घेण्यात येणार नाही. |

| अ.क्र. | समितीचे नाव | बैठकीचा वार व दिनांक | बैठकीत झालेले कामकाज |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | | (३) मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी "मराठी भाषा गौरव दिन" आयोजित करण्यात येईल. उक्त कार्यक्रमात दोन्ही सभागृहातील इच्छूक सन्माननीय सदस्य, पत्रकार व या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत कविवर्य कुसुमाग्रज यांच्या कविता, ललितलेख, कथा, नाट्यकृती यांचे अभिवाचन व स्वरचित कविता यांचे सादरीकरणाचे आयोजन करण्यात येईल. |

# विवरण क्रमांक - ११
## शासकीय विधेयकासंबंधी सांख्यिकीय माहिती
## सन २०२४ चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

| अ. क्र. | **विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक** | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | **सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२४** | सहकार | श्री.दिलीप वळसे-पाटील | २६/०२/२०२४ | २६/०२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २७/०२/२०२४ | --- | --- | --- | --- | -- | विधानपरिषदे कडे विचारार्थ प्रलंबित |
| २ | **सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२४** | गृह | श्री. देवेंद्र फडणवीस | २६/०२/२०२४ | २६/०२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २७/०२/२०२४ | २८/०२/२०२४ | --- | --- | --- | --- | --- |

| अ. क्र. | **विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक** | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | **(२)** | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| ३ | **सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२४** | नगरविकास | मुख्यमंत्री | २६/०२/२०२४ | २६/०२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २७/०२/२०२४ | २८/०२/२०२४ | --- | --- | --- | --- | --- |
| ४ | **सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२४** | वित्त | श्री.अजित पवार | २८/०२/२०२४ | २७/०२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २८/०२/२०२४ | २८/०२/२०२४ | --- | --- | --- | सन २०२४ चा १७ | --- |
| ५ | **सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४** | उच्च व तंत्र शिक्षण | श्री. चंद्रकांत (दादा) पाटील | २८/०२/२०२४ | २८/०२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २९/०२/२०२४ | २९/०२/२०२४ | --- | --- | --- | --- | --- |

| अ. क्र. | **विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक** | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | **(२)** | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| ६ | **सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४** | सहकार | श्री.दिलीप वळसे-पाटील | २९/०२/२०२४ | २९/०२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १/०३/२०२४ | १/०३/२०२४ | --- | --- | --- | --- | --- |
| ७ | **सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०२४** | वित्त | श्री.अजित पवार | १/०३/२०२४ | १/०३/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १/०३/२०२४ | १/०३/२०२४ | --- | --- | --- | --- | --- |
| ८ | **सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२४** | नगरविकास | मुख्यमंत्री | १/०३/२०२४ | १/०३/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १/०३/२०२४ | १/०३/२०२४ | --- | --- | --- | --- | --- |

| अ. क्र. | **विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक** | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | **(२)** | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| ९ | **सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० – महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (सुधारणा) विधेयक, २०२४** | कामगार | श्री.सुरेश खाडे | १/०३/२०२४ | १/०३/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १/०३/२०२४ | १/०३/२०२४ | --- | --- | --- | --- | --- |
| १० | **सन २०२४ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १ – महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४** | उच्च व तंत्र शिक्षण | श्री. चंद्रकांत (दादा) पाटील | २८/०२/२०२४ | २८/०२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २९/०२/२०२४ | २८/०२/२०२४ | --- | --- | --- | --- | --- |

***

## विवरण क्रमांक -१२

## संविधान सुधारणेच्या अनुसमर्थनाचा प्रस्ताव

**निरंक**

******

# विवरण क्रमांक -१३

## पुरःस्थापित अशासकीय विधेयके

निरंक

******

## विवरण क्रमांक -१४

## विचारात घेण्यात आलेले अशासकीय विधेयके

**निरंक**

******

## विवरण क्रमांक -१५

## (अध्यादेश नापसंत करण्यासंबंधी प्रस्ताव)

निरंक

******

## विवरण क्रमांक–१६

## महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२३-२०२४ च्या पुरवणी खर्चाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी मागण्या मंजूर झाल्या.

## पुरवणी मागण्यांवर चर्चेसाठी प्राथम्यक्रमात असलेले विभाग

| अ. क्र. (१) | विभागाचे नाव (२) | एकूण मागण्या (३) | | मागण्यावर चर्चा व मतदानाचा दिनांक (४) |
|---|---|---|---|---|
| (अ) | | | | |
| (१) | महसूल व वन विभाग | ६ | } | दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ |
| (२) | कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | ३ | | |
| (३) | सार्वजनिक बांधकाम विभाग | ६ | | |
| (४) | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | ३ | | |
| | | ----- | | |
| | **एकूण** | **१८** | | |
| | | ----- | | |

## (ब) दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी चर्चारोधानंतर मतास टाकण्यात आलेल्या पुरवणी खर्चाच्या मागण्या

| अ. क्र.<br>(१) | विभागांची नावे<br>(२) | एकूण मागण्या<br>(३) |
|---|---|---|
| (१) | सामान्य प्रशासन विभाग | २ |
| (२) | गृह विभाग | ५ |
| (३) | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | १ |
| (४) | नगरविकास विभाग | ३ |
| (५) | वित्त विभाग | ४ |
| (६) | जलसंपदा विभाग | २ |
| (७) | विधि व न्याय विभाग | २ |
| (८) | ग्रामविकास विभाग | १ |
| (९) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | १ |
| (१०) | नियोजन विभाग | ४ |
| (११) | सार्वजनिक आरोग्य विभाग | १ |
| (१२) | वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग | १ |
| (१३) | आदिवासी विकास विभाग | १ |
| (१४) | सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग | २ |
| (१५) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | २ |
| (१६) | महिला व बाल विकास विभाग | १ |
| (१७) | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | १ |

| | | |
|---|---|---|
| (१८) | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | १ |
| (१९) | इतर मागास बहुजन कल्याण विभाग | १ |
| (२०) | दिव्यांग कल्याण विभाग | १ |
| | | ---------<br>-- |
| | **एकूण मागण्या** | **३७** |
| | | ---------<br>-- |
| | ------------------------------------------------<br>**एकूण : (अ) + (ब) = ५५**<br>**१८ ३७**<br>------------------------------------------------<br>-------- | |

***

## विवरण क्रमांक–१७

## सन २०२३-२०२४ चे पुरवणी खर्चाच्या मागण्यांवरील कपात सूचना

| अ. क्र. (१) | विभाग (२) | एकूण (३) | मान्य (४) | अमान्य (५) | चर्चा व मतदानाचा दिनांक (६) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | महसूल व वन विभाग | १५ | १० | ५ | दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ |
| (२) | कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | ७ | ६ | १ | |
| (३) | सार्वजनिक बांधकाम विभाग | ३८ | २८ | १० | |
| (४) | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | ६ | ५ | १ | |
| | | -------------- | | | |
| | **एकूण** | ६६ | ४९ | १७ | |
| | | -------------- | | | |

| अ. क्र. | प्राथम्यक्रमात नसलेल्या विभागांची नावे | | |
|---|---|---|---|
| (१) | सामान्य प्रशासन विभाग | } | सदर विभाग प्राथम्यक्रमात नसल्यामुळे त्या विभागांवर कपात सूचना स्विकारण्यात आल्या नाहीत. |
| (२) | गृह विभाग | | |
| (३) | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | | |
| (४) | नगरविकास विभाग | | |
| (५) | वित्त विभाग | | |
| (६) | जलसंपदा विभाग | | |
| (७) | विधि व न्याय विभाग | | |
| (८) | ग्रामविकास विभाग | | |
| (९) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | | |
| (१०) | नियोजन विभाग | | |
| (११) | सार्वजनिक आरोग्य विभाग | | |
| (१२) | वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग | | |
| (१३) | आदिवासी विकास विभाग | | |
| (१४) | सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग | | |
| (१५) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | | |
| (१६) | महिला व बाल विकास विभाग | | |
| (१७) | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | | |
| (१८) | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | | |
| (१९) | इतर मागास बहुजन कल्याण विभाग | | |
| (२०) | दिव्यांग कल्याण विभाग | | |

***

## विवरण क्रमांक—१८

## सन २०२३ - २०२४ च्या पुरवणी विनियोजन विधेयक

## (पुरवणी विनियोजन विधेयक दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी संमत झाले)

## पुरवणी विनियोजन विधेयकावरील मुद्दे

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | स्वीकृत | अस्विकृत | एकूण |
|---|---|---|---|---|
| (१) | श्री. नाना पटोले, वि.स.स. | ३ | ४ | ७ |
| (२) | श्री. सुभाष धोटे, वि.स.स. | १ | २ | ३ |
| | **एकूण** | **४** | **६** | **१०** |

***

# विवरण क्रमांक -१९

## सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पातील मागण्या

**निरंक**

****

## विवरण क्रमांक -२०

## सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पातील मागण्यांवरील कपात सूचना

निरंक

****

## विवरण क्रमांक-२१

## सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पीय विनियोजन विधेयक

## (अर्थसंकल्पीय विनियोजन विधेयक दिनांक १ मार्च, २०२४ रोजी संमत झाले)

## अर्थसंकल्पीय विनियोजन विधेयकावरील मुद्दे

**निरंक**

******

## विवरण क्रमांक -२२

### अध्यक्षांना पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव

(म.वि.स. नियम ११ अन्वये)

**निरंक**

****

## विवरण क्रमांक-२३

## उपाध्यक्षांना पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव

**निरंक**

****

## विवरण क्रमांक -२४

### निंदाव्यंजक प्रस्ताव

(म.वि.स. नियम २३ अन्वये)

**निरंक**

****

## विवरण क्रमांक -२५

## एखाद्या व्यक्तीविरुद्ध करावयाच्या अभिकथनासंबंधी दिलेल्या सूचना

(म.वि.स. नियम ३५ अन्वये)

**निरंक**

****

## विवरण क्रमांक -२६

## म.वि.स. नियम ४७ अन्वये मंत्र्यांनी केलेली निवेदने

| अ. क्र. (१) | मंत्री (२) | विषय (३) | सभागृहात निवेदन केल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १. | श्री. एकनाथ शिंदे, मा. मुख्यमंत्री | सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेबाबत | १ मार्च, २०२४ |
| २. | श्री. अतुल सावे, मा. गृहनिर्माण मंत्री | वांद्रे रिक्लेमेशन, आदर्श नगर (वरळी) व अभ्युदय नगर (काळाचौकी) या तीन म्हाडा अभिन्यासातील इमारतींचा C & D A मार्फत एकत्रित पुनर्विकास करण्याबाबत. | १ मार्च, २०२४ |
| ३. | श्री. अतुल सावे, मा. गृहनिर्माण मंत्री | धनगर समाजाला मुख्य समाजाच्या प्रवाहात आणण्याबाबत | १ मार्च, २०२४ |

***

## विवरण क्रमांक-२७

## सदस्यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

(म.वि.स. नियम ४८ अन्वये)

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -२८

## नियम स्थगित करण्याबाबतचा प्रस्ताव

(म.वि.स. नियम ५७ अन्वये)

द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२४

**निरंक**

***

# विवरण क्रमांक-२९

## अर्धा-तास चर्चा सर्वसाधारण

(म.वि.स. नियम ९४ अन्वये)

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -३०

## मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव

(म.वि.स. नियम ९५ अन्वये)

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -३१

## मंत्रीमंडळावर विश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव

(म.वि.स. नियम २३ अन्वये)

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -३२

### स्थगत प्रस्ताव

(म.वि.स. नियम ९७ अन्वये)

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | विषय (३) | निर्णय (४) | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | एसीबीसी कायदा रद्द झाल्याबाबत | अमान्य | २६ फेब्रुवारी, २०२४ |
| (२) | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | एसीबीसी कायदा रद्द झाल्याबाबत | अमान्य | २७ फेब्रुवारी, २०२४ |
| (३) | श्री. अबू आजमी, वि.स.स. | मानखुर्द शिवाजीनगर विभागात आग लागून ४० झोपड्या जळल्याबाबत | अमान्य | २८ फेब्रुवारी, २०२४ |
| (४) | श्री. अबू आजमी, वि.स.स. | मानखुर्द शिवाजीनगर विभागात आग लागून ४० झोपड्या जळल्याबाबत | अमान्य | -- " -- |
| (५) | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | एसीबीसी कायदा रद्द झाल्याबाबत | अमान्य | -- " -- |
| (६) | श्री. जयंत पाटील, वि.स.स. | दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२४ रोजी पुणे येथील डेक्कन परिसरातील खंडोजी बाबा चौकात एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी ज्येष्ठ पत्रकार श्री. निखिल वागळे यांच्यावर केलेला प्राणघातक हल्ला | अमान्य | -- " -- |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | विषय (३) | निर्णय (४) | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| (७) | श्री. शिरीषकुमार नाईक, वि.स.स. | मुंबई शहर स्वच्छ ठेवणाऱ्या “स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानातील स्वयंसेवकांवर बेरोजगारीचे संकट आल्याबाबत | अमान्य | -- " -- |
| (८) | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | वसई (जिल्हा पालघर) तालुक्यातील पाणीपुरवठा व स्मशानभूमीचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत | अमान्य | -- " -- |
| (९) | श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. | राज्यातील आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तकांच्या मागण्याबाबत | अमान्य | -- " -- |
| (१०) | श्री. अमित देशमुख, वि.स.स. | नांदेड मुख्य रस्त्यालगत असलेल्या कृषी विभागाची जागा आरोग्य व कुटुंब कल्याण विभागास हस्तांतरण करणेबाबत | अमान्य | १ मार्च, २०२४ |
| (११) | श्री. जयंत पाटील, वि.स.स. | राज्यात मोठ्या प्रमाणात ड्रग व अमली पदार्थांची विक्री होत असल्याबाबत | अमान्य | -- " -- |
| (१२) | श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. | आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तकांच्या न्याय व रास्त मागण्यांबाबत | अमान्य | -- " -- |

| अ. क्र. (१) | सदस्यांचे नाव (२) | विषय (३) | निर्णय (४) | सभागृहात उल्लेख केल्याची तारीख (५) |
|---|---|---|---|---|
| (१३) | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | मा. मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीनिशी शेरे असलेली निवेदने व पत्रे मुख्यमंत्री सचिवालयास प्राप्त होत असल्याबाबत | अमान्य | -- " -- |
| (१४) | श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. | नवी मुंबईतील पामबीच मार्गावर नेरुळ-सीवूड परिसरातील खाडीकिनारी नैसर्गिकरित्या तयार झालेल्या पाणथळीच्या जागेवर निवासी संकुलासाठी खुल्या करण्याबाबत | अमान्य | -- " -- |

***

## विवरण क्रमांक -३३

## सभागृहात उपस्थित करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे

**निरंक**

***

## विवरण क्रमांक - ३४

## औचित्याच्या मुद्द्यांवरील माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

निरंक

***

## विवरण क्रमांक -३५

## पॉईंट ऑफ इन्फॉरमेशनच्या माध्यमातून मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात मा. अध्यक्षांच्या निदेशानुसार संबंधित मंत्र्यांनी केलेली निवेदने

**निरंक**

***

## विवरण क्रमांक - ३६

## अल्पकालीन चर्चा

(म.वि.स. नियम १०१ अन्वये)

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -३७

## अल्पकालीन चर्चेच्या सूचनेवरील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(म.वि.स. नियम १०१ अन्वये)

**निरंक**

***

## विवरण क्रमांक - ३८

## लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये)

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -३९
## लक्षवेधी सूचनेवरील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवणे
(म.वि.स. नियम १०५ अन्वये)

| अ. क्र. (१) | विषय (२) | उत्तरीत झालेल्या सूचनेचा दिनांक व सदस्यांचे नांव (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| १. | "हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे जन्मस्थळ असलेल्या खेड येथील वाडयाचे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे." | श्री. दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला. | दिनांक ०१ मार्च, २०२४ रोजी प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला. |

***

## विवरण क्रमांक -४०

## शासकीय ठराव (म.वि.स. नियम ११० अन्वये).

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -४१

## अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६).

निरंक

***

## विवरण क्रमांक -४२

## समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव

## (म.वि.स. नियम १९४ अन्वये)

निरंक

***

## विवरण क्रमांक -४३

## समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव (सर्वसाधारण)

## (म.वि.स. नियम १६३ अन्वये)

निरंक

***

## विवरण क्रमांक -४४

## विधानसभेच्या सन २०२४ मधील द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये विधानसभा विशेषाधिकार कक्षाकडे प्राप्त झालेल्या विशेषाधिकारभंगाच्या सूचनांचे विवरणपत्र

| अ. क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | १६७ | श्री. रोहित पवार वि.स.स. दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ | **श्री. उदय सामंत, मा. उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. हर्षदीप कांबळे, प्रधान सचिव, उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन व श्री. डॉ. बिपिन शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ यांच्याविरुद्ध**<br><br>सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील मौजे पाटेगाव आणि खंडाळा, (तालुका-कर्जत, जिल्हा अहमदनगर) येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन होण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत औद्योगिक विकास विभागामार्फत भू-निवड समितीची स्थळ पाहणी आणि सर्व्हेक्षण होऊन उच्चधिकार समितीची दिनांक २४ जुलै २०२२ रोजी मिळालेल्या मान्यतेनुसार मौजे पाटेगाव आणि खंडाळा (ता. कर्जत) येथील ६३० हेक्टर क्षेत्र औद्योगिक वसाहतीसाठी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या प्रकरण ६ व खंड २ (ग) च्या तरतुदी लागू करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. मात्र सदरहू क्षेत्राची औद्योगिक क्षेत्राची अधिसूचना शासनाकडून जाहीर न झाल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी | | खुलासा मागविण्या-साठी प्रस्तावित |

| अ. क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | श्री. उदय सामंत, मा. उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. हर्षदीप कांबळे, प्रधान सचिव, उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन व श्री. डॉ. बिपिन शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, यांना वारंवार पत्रव्यवहार व स्मरणपत्र देऊनही यावर कोणतीच कारवाई होत नसल्याने सदर विषय दिनांक २७ डिसेंबर २०२२ रोजी सभागृहात उपस्थित केला, यावर अधिवेशनाचे कामकाज संपेपर्यंत अधिसूचना निर्गमित करून सन २०२३ च्या जानेवारी, महिन्यात सर्व अनुषंगिक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊन कर्जत येथील औद्योगिक क्षेत्रात शासनाच्या मध्यस्थीने उद्योग आणले जातील असे आश्वासित केले होते मात्र आश्वासानाप्रमाणे कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे मार्च, २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुन्हा सदरील विषय उपस्थित केला तरीही शासन स्तरावर कुठलीही कारवाई करण्यात आली नसल्याने सन्माननीय सदस्यांनी दिनांक ८ डिसेंबर २०२३ रोजी हिवाळी अधिवेशन कालावधीत सदर औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याबाबत निर्माण झालेल्या विविध अडचणी सोडवण्याकरिता मंत्री स्तरावर बैठक आयोजित करण्याबाबतचे पत्र मा.उद्योग मंत्री यांना देऊन सदरहू बैठकीस सन्माननीय सदस्यांनाही बोलविण्यात यावे अशी विनंती केली होती मात्र सरहू प्रकरणी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी | | |

| अ. क्र. | सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | मा. उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या विधानमंडळातील दालनात झालेल्या बैठकीत स्थानीक लोकप्रतिनिधी म्हणून सन्माननीय सदस्यांना न बोलविल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय” | | |

***

## विवरण क्रमांक -४५

## संविधिक प्रस्ताव

(म.वि.स. नियम २९० अन्वये)

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -४६

### अंतिम आठवडा प्रस्ताव

(म.वि.स. नियम २९२ अन्वये)

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -४७

## अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेसंबंधातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

(म.वि.स. नियम २९२ अन्वये)

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -४८

## सार्वजनिक हितसंबंधातील इतर बाबतीतील प्रस्ताव

## (म.वि.स. नियम २९३ अन्वये)

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या | - | ०२ |
| (२) | मान्य सूचनांची संख्या | - | ०२ |
| (३) | चर्चा झालेल्या सूचनांची संख्या | - | ०२ |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | ॲड. आशिष शेलार, श्री. सदा सरवणकर, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री मंगेश कुडाळकर, अतुल भातखळकर, प्रकाश सुर्वे, नितेश राणे, अमित साटम, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री योगेश सागर, दिलीप लांडे, ॲड. राहुल कुल, श्री. प्रताप सरनाईक, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. बालाजी किणीकर, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री शांताराम | "गत दिड वर्षाच्या काळात मुंबई शहरामध्ये गृहनिर्माण व गतिशील परिवहन हे मुद्दे प्राधान्याने विचारात घेऊन व विकास हाच केंद्रबिंदू मानून मुंबई शहरात स्मार्ट सिटीच्या उभारणीव्दारे स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यावर भर देऊन विकासाची नियोजनात्मक व कालबध्द कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भूमीपूजन होऊन कामेही सुरु झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई शहरातील | दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी चर्चा झाली व दिनांक २८ फेब्रुवारी व १ मार्च, २०२४ रोजी चर्चा झालेल्या विरोधी पक्षाचा प्रस्ताव व सदर प्रस्तावावर दिनांक १ मार्च, २०२४ रोजी एकत्रित उत्तर देण्यात आले. |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| (१) | (२) | (३) | (४) |
| | मोरे, राम कदम, विश्वनाथ भोईर, सुनिल कांबळे, महेंद्र थोरवे, मिहिर कोटेचा, सुनिल राणे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्रीमती अश्विनी जगताप, गिता जैन, सर्वश्री संजय केळकर, किसन कथोरे, कालीदास कोळंबकर, पराग शाह, महेश लांडगे, सिध्दार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, महेंद्र दळवी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्रीमती विद्या ठाकूर, मंदा म्हात्रे, सर्वश्री गणेश नाईक, रणधीर सावरकर, डॉ. संजय कुटे, सर्वश्री जयकुमार रावल, हरिभाऊ बागडे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री अभिमन्यू पवार, राम सातपुते, राजेश पवार, सुरेश भोळे, विनोद अग्रवाल, रत्नाकर गुट्टे, समाधान आवताडे, संभाजी निलंगेकर-पाटील, श्रीमती मेघना साकोरे- बोर्डीकर, श्री. सचिन कल्याण-शेट्टी, | ४५० कि.मी.च्या रस्त्यांच्या क्राँक्रीटीकरणाची ६ हजार कोटींपेक्षा जास्त रक्कमेच्या कामांची निविदा काढण्यात येऊन सबंधित वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर सबंधित कामांचे भूमीपूजन मा. पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मेट्रो-२ए आणि २बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर यामध्ये वाहतूक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने व सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणांकरिता सिमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | महेश चौघुले, नारायण कुचे, बबनराव लोणीकर, सौ. सीमा हिरे, श्री. किर्तीकुमार भांगडीया, प्रा.डॉ.अशोक उईके, डॉ. संदीप धुर्वे, श्री. नामदेव ससाणे, डॉ. देवराव होळी, सर्वश्री मोहन मते, प्रकाश आवाडे, महेश बालदी, विकास कुंभारे, कृष्णा खोपडे, डॉ. पंकज भोयर, श्री. समिर कुणावार, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री संजय सावकारे, राजेश पाडवी, हरिष पिंपळे, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री प्रताप अडसड, दादाराव केचे, टेकचंद सावरकर, कृष्णा गजबे, संजिवरेड्डी बोदकुरवार, मदन येरावार, दिलीप बोरसे, ॲड. राहूल ढिकले, सर्वश्री प्रशांत बंब,संतोष दानवे, प्रकाश भारसाकळे, डॉ. तुषार राठोड, डॉ. राजेंद्र शिंगणे, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री प्रकाश सोळंके, दिलीपराव बनकर, दिलीप | स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एकखिडकी व कालबध्द स्थलांतरण योजना राबविण्याची तसेच, एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ठ प्रकरणांबाबतीतील शासनाचे धोरण निश्चित करण्याची आवश्यकता, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळांच्या वसाहतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहरातील डीपी प्लॅन व रिंग रोड नव्याने तयार करण्याची आवश्यकता, पुण्यातील वाढत्या झोपडपट्ट्यांची समस्या सोडविण्यासाठी झोपडपट्टी धोरण व नियमावली करण्याची आवश्यकता, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभूत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता, स्वारगेट ते कात्रज, खडकवासला ते हडपसर मेट्रो रेल्वेच्या कामाला गती देण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | मोहिते, दत्तात्रय भरणे, चेतन तुपे, श्रीमती सरोज अहिरे, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री बाबासाहेब पाटील, यशवंत माने, दिपक चव्हाण, बाळासाहेब आजबे, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, संग्राम जगताप, दौलत दरोडा, इंद्रनील नाईक, चंद्रकांत नवघरे, अतुल बेनके, सुनिल शेळके, सुनिल टिंगरे, निलेश लंके, वि.स.स. | पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबईतील भेंडीबाजार, धारावी यासारख्या गजबजलेल्या भागांचे पुनरुज्जीवन करण्याच्या दृष्टीने उभारण्यात येणारे एसबीयुटी सारखे गृहनिर्माण प्रकल्प नागरी पुनरुत्थान घडविणारे असल्याचे निदर्शनास येणे, धारावीत डीआरपीपीएलच्या माध्यमातून पुनर्विकास प्रकल्प राबविण्याचे धोरण करण्यात येणे, मुंबईतील ५६ म्हाडा वसाहतींच्या वाढीव सेवा शुल्काची अंदाजे रु. ४८४ कोटींची रक्कम माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात येणे, जुन्या चाळींची व्याख्या बदलून हेरीटेज टीडीआर प्रत्यक्ष अंमलात आला असणे, स्वयं-पुनर्विकासाच्या माध्यमातून गृहनिर्माण प्रकल्प अधिक गतीमान करण्यासाठी मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणाऱ्या कर्ज मर्यादित वाढ करण्यात आली असणे, स्वयं-पुनर्विकास इमारतीतील मूळ | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | रहिवाशांनाही स्टॅम्पड्युटीवर सूट देण्याचा निर्णय घेण्यात येणे, स्वयं-पुनर्विकास करताना येणाऱ्या विविध अडचणी/तक्रारी सोडविण्यासाठी जिल्हास्तरीय समितीमध्ये को-ऑप. हौ. फेडरेशनच्या एका सदस्याचा समावेश करण्यात येणे, मुंबईतील ९ मीटर पेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांवरील गृहनिर्माण संस्थांनाही संपूर्ण चटई क्षेत्राचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबईतील १४ हजारांहून अधिक सेस इमारतींचे त्वरीत स्ट्रक्चरल ऑडिट करून धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाला गती देण्याचा निर्णय घेण्यात येणे, सीआरझेडचा कायदा बदलून विकास कामांना गती देण्याचे धोरण आणण्याची आवश्यकता, गिरणी कामगारांना घरांसाठी पात्र करून घेण्यासाठी सर्वात मोठे अभियान राबविण्यात येणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, मानीव अभिहस्तांतरण करण्यासाठी स्टॅम्पड्युटी भरण्यात | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | सुलभता होण्यासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना सुरु करण्यात येणे, ग्रामीण भागातील शबरी घरकुल योजना शहरातही राबविण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत त्या परिसरातील अनिवासी झोपडीधारक, स्टॉलधारक यांची पात्रता निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु असणे, एमएसआरडीसीच्या माध्यमातून वांद्रे रेक्लमेशन येथील २१ एकर भूखंडाचा पुनर्विकास प्रस्तावित असणे, मुंबईतील म्हाडाच्या ३८८ पुनर्रचित इमारतींच्या पुनर्विकासासाठी व म्हाडा वसाहतीत राहाणाऱ्या रहिवाशांच्या ३५ मागण्यांपैकी १६ मागण्यांबाबत सुधारीत शासन निर्णय जारी करण्यात येणे, झोपडपट्टी पुनर्वसनामधील सदनिका हस्तांतरण शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, मुंबईतील झोपडपट्ट्यांचे निर्मूलन करण्याकरिता व धोकादायक इमारतीतील रहिवाशांचे हक्काचे घर मिळविण्याचे स्वप्न साकार करण्याकरिता क्लस्टर विकासाच्या माध्यमातून विविध पुनर्विकास | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | प्रकल्प राबविण्यात येणे, ठाणे शहरात एमआयडीसीच्या अभिन्यासामधील भूखंडावर जगातील सर्वात मोठा क्लस्टर प्रकल्प राबविण्यात येणे, म्हाडाकडून पुनर्विकास होणाऱ्या इमारतीतील रहिवाशांना तसेच, झोपडीधारकांना विकासकाविरुद्ध महारेरामध्ये अपिल करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना केलेल्या कराराप्रमाणे तेथील भाडेकरूंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत बऱ्याच विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, पुनर्विकास करावयाच्या इमारतींचा तात्काळ विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील नेहरुनगर व टिळकनगर म्हाडा वसाहतीतील पुनर्विकसित इमारतींना १० ते १५ वर्ष उलटूनही अद्याप भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) न मिळणे, जिल्हाधिकाऱ्यांच्या हद्दीतील जमिनींवरील धारणाधिकार रुपांतरीत करण्याकरिता आकारण्यात येणारे शुल्क जीर्ण इमारतींच्या बाबतीत २.५ टक्के करण्याची आवश्यकता, पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेशी | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच, म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुनर्विकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, मुंबईतील २१ मंड्यांचा पुनर्विकास प्रगतीपथावर असून त्यापैकी दोन मंड्यांचे बांधकाम पूर्ण, ६ मंड्यांचे बांधकाम पूर्णत्वाकडे व ७ मंड्यांचे आराखडे मंजुरीसाठी सादर असणे, मुंबई मेट्रो लाईन-३ या प्रकल्पाची मार्गिका धारावी येथून जाणार असल्याने त्याकरिता येथील ३,३०८ चौ.मी. इतका भूखंड एमएमआरडीएकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात येणे, ठाणे-बोरिवली भुयारी मार्गाची निर्मिती करण्याचे धोरण प्रस्तावित असणे, वाशी येथील सध्याच्या २ खाडी पुलांना समांतर अशा तिसऱ्या ६ पदरी खाडी पुलाच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, मुंबई-पुणे मिसींग लिंक या ६,७०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे काम सुरु असणे, या सर्व प्रकल्पांमुळे | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | वाहतूक कोंडी सुटेल व अपघातांचे प्रमाण कमी होईल तसेच, इंधन व वेळेची बचत होऊन प्रदुषणात घट होईल हे उद्दीष्ट असणे, वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूची निर्मिती, शिवडी ते न्हावा-शेवा या मुंबई पोरबंदर प्रकल्पाची निर्मिती यामुळे मुंबईतील वाहतूक सेवा सुलभ होणे, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्याच्या सहापदरी रुंदीकरणाच्या कामासाठी ५६१.८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, देवनार डंपिंगमध्ये वनस्पतीजन्य सुगंधी फवारणीकरुन त्या भागातील प्रदूषण व दुर्गंधी कमी करण्यात येणे, मुंबईकरांचा प्रवास वेगवान करण्याकरिता निर्माण करण्यात आलेल्या कोस्टल रोडचे काम अंतिम टप्प्यात असणे, मुंबई व उपनगरातील ठाणे-कल्याण इत्यादी भागातील झोपडपट्ट्यांचे समूळ उच्चाटन करून व पायाभूत सुविधा उभारुन पर्यावरणपूरक विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने केलेली व अधिक गतीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी. | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| २. | सर्वश्री विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, सुनिल प्रभू, अमीन पटेल, सुरेश वरपुडकर, डॉ. जितेंद्र आव्हाड, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री अमित देशमुख, संग्राम थोपटे, बळवंत वानखडे, कु. प्रणिती शिंदे, श्री. राजू आवळे, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री पी.एन. (सडोलीकर) पाटील, संजय जगताप, राजू पारवे, सुनिल भुसारा, उदयसिंह राजपूत, डॉ. नितीन राऊत, ॲड. अशोक पवार, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, रोहित पवार, रमेश कोरगांवकर, लहु कानडे, सुनिल राऊत, सहसराम कोरोटे, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, रणजित कांबळे, | "राज्यात शासनाचे शेतकरीविरोधी धोरण व नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यातील शेतकरी अस्मानी व सुलतानी संकटात सापडला असणे, सोयाबीन, कापूस इ. कृषी मालाची खरेदी हमीभावापेक्षा कमी दराने होत असणे, तक्रार करुनही कारवाई न करता व्यापाऱ्यांना पाठीशी घातले जाणे, सीसीआयच्या जाचक अटींमुळे शेतकऱ्यांचा कापूस अद्याप विकला न जाणे, केंद्र सरकारच्या आयात-निर्यात धोरणातील धरसोडपणामुळे अनेक शेतीमालाचे दर पडले असणे, निर्यातबंदी करून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करून कर्जबाजारी करणे, किडरोग प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात शासनाला आलेले अपयश, ड्रॅगन फ्रुट फळ पीक अनुदानात वाढ करण्याची आवश्यकता, संत्रा, सिताफळ, पेरू, काजू यासारख्या फळप्रक्रिया उद्योगांना बळ देण्याबाबत शासनाची नकारात्मक भूमिका, पिकविमा कंपन्यांमार्फत शेतकऱ्यांची होणारी लूट, त्यामुळे पीक विमा योजना प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांना थेट लाभ मिळवून | दिनांक २८ फेब्रुवारी व १ मार्च, २०२४ २०२४ रोजी चर्चा झाली व दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी चर्चा झालेल्या सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव व सदर प्रस्तावावर दिनांक १ मार्च, २०२४ रोजी एकत्रित उत्तर देण्यात आले. |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | राजेश टोपे, बाळासाहेब पाटील, अनिल देशमुख, प्राजक्त तनपुरे, कुणाल पाटील, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, शिरीष चौधरी, संदिप क्षीरसागर, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री ऋतुराज पाटील, अस्लम शेख, धीरज देशमुख, राजेश एकडे, विकास ठाकरे, सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री झिशान सिद्दीकी, विक्रमसिंह सावंत, अमित झनक, वि.स.स. | देण्याची होत असलेली मागणी, अवकाळी पाऊस व गारपिटीने भाजीपाला, गहू, धान, हरभरा, तूर, ज्वारी, बाजरी इत्यादी पिकांचे तसेच आंबा, काजू, संत्रा, केळी, पानपिंपरी या फळबागांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, धानाला घोषित झालेला २० हजार रुपयांचा बोनस अद्याप न मिळणे, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यात ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान जमा न होणे, दुधाचे पडलेले दर तसेच दुधाला ५ रुपये अनुदानाची घोषणा हवेत विरणे, छत्रपती शिवाजी महाराज कृषी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी न करणे, राज्यात शेततळ्यांचे उद्दिष्ट पूर्ण न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये पसरलेले नैराश्य, शेतकरी आत्महत्या रोखण्यास शासनास आलेले अपयश, राज्यातील धरणांमध्ये विशेषतः विदर्भ व मराठवाड्यात पाणीसाठा कमी असल्यामुळे तसेच भूजल पातळी कमी असल्याने निर्माण होत असलेली भीषण पाणी टंचाई, राज्यात निर्माण झालेल्या कायदा सुव्यवस्थेच्या गंभीर प्रश्नामुळे | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | जनतेमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, पत्रकार निखिल वागळे व सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी यांच्यावर झालेले भ्याड हल्ले, विद्यमान विधानसभा सदस्यांनी पोलीस ठाण्यात केलेला गोळीबार, दहिसर येथे माजी नगरसेवकाची करण्यात आलेली हत्या, महिला व लहान बालिकांवरील लैंगिक अत्याचाराने गाठलेला कळस, खून, बलात्कार, दरोडे, सायबर बुलिंग, सायबर क्राईमच्या गुन्ह्यांमध्ये झालेली भरमसाठ वाढ, परिणामी राज्याची प्रतिमा मलिन होत असणे, राजकीय नेत्यांकडे गुंडांचा वावर वाढला असून पुण्यातील कुख्यात गुंडाने मंत्रालयात घेतलेल्या भेटीमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, तडीपार गुंडांचा राज्याच्या मुख्यालयात राजरोजसपणे सुरू असलेला वावर, पोलिसांच्या पत्नीचा अपमान होईल असे अशोभनीय व्यक्तव्य सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधीकडून करण्यात आल्याने जनतेमध्ये पसरलेला तीव्र संताप, राज्यात ऑर्केस्ट्रॉच्या | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | नावाखाली सर्रासपणे अवैधरित्या डान्सबार सुरू असणे, मुंबई पोलीस दलात व राज्यात पोलिसांची हजारो पदे रिक्त असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, पोलिसांवर पडत असलेला अतिरिक्त ताण, मराठा, ओबीसी, मुस्लीम, लिंगायत, धनगर समाजाच्या आरक्षणप्रश्नी नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करून आरक्षणावरून समाज-समाजामध्ये तेढ निर्माण करणे, राज्यात अंमली पदार्थांचा झालेला सुळसुळाट, गुटखा, विदेशी सिगारेट, ई-सिगारेट व तत्सम बंदी असलेल्या पदार्थांची बेकायदेशीररित्या ठिकठिकाणी सुरू असलेली विक्री, आदिवासी बांधवांपर्यंत योजना पोहोचविण्यास शासनास आलेले अपयश, शासनाच्या विविध विभागात होत असलेला भ्रष्टाचार, प्रिन्सेस स्ट्रीट ते वांद्रे वरळी या प्रकल्पाचे काम अपूर्ण असतानाही किनारा मार्ग खुला करण्याचा अट्टाहास करण्यात येणे, मुंबई MMR क्षेत्रातील प्रकल्प वेळेत पूर्ण न करता अनेक प्रकल्पांच्या किमती वाढवून छुप्या पध्दतीने केला | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | जात असलेला गैरव्यवहार, जल जीवन मिशन योजनेमध्ये ठाणे, रायगड, पालघर, नगर व इतर जिल्ह्यात झालेली अनियमितता, राज्यातील अंगणवाडी सेविका व आशा वर्कर्सच्या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष करणे, अंगणवाडी सेविकांकरिता घेण्यात आलेल्या मोबाईलमध्ये झालेला कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार तसेच अंत्योदय योजनेतील साडी वाटपात झालेला गैरव्यवहार, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाची नियमबाह्य फेररचना व मुख्य अभियंता विद्युत हे पद नियमबाह्यरित्या निरसित करणे, तसेच प्रेसिडेन्सी डिव्हिजन मध्ये होत असलेला भ्रष्टाचार, प्रचंड विरोध असतानाही केवळ कंपन्यांच्या फायद्यासाठी स्मार्ट मीटर योजना सर्वसामान्यांच्या माथी मारणे, सार्वजनिक आरोग्य विभागात औषधांची खरेदी तसेच उपकरणांच्या खरेदीत झालेला भ्रष्टाचार, प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यास राज्य शासनास आलेले अपयश, उल्हासनगर महानगरपालिकेत झालेला करोडो रूपयांचा भ्रष्टाचार, | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | देवस्थान जमिनींची बेकायदेशीररित्या सुरू असलेली विक्री, भूसंपादन प्रक्रियेत झालेले गैरव्यवहार, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डात झालेला भ्रष्टाचार, मिठागरे बुजवून बांधकामांना परवानगी दिल्याने पर्यावरणाचा निर्माण झालेला प्रश्न, निधीवाटपात करण्यात येत असलेला पक्षपातीपणा, पश्चिम विदर्भात सिंचनाचा अनुशेष असणे, पूर्व विदर्भात खारपाण पट्ट्यात असलेला सिंचनाचा अभाव व त्यामुळे येथे खारपाण विकास महामंडळ स्थापन होण्याची आवश्यकता, स्थानिकांचा विरोध असताना देखील नागरिकांचा विरोध डावलून वाढवण बंदर प्रकल्प पूर्ण करण्याकडे घातलेला घाट, मुंबई-गोवा महामार्गाचे काम दहा वर्षापासून रखडले असल्याने न्यायालयाने शासनाला फटकारणे, राज्यातील शहरांत फुटपाथ नसल्यामुळे गेल्या तीन वर्षांत सुमारे ८ हजार पादचाऱ्यांचा झालेला मृत्यू, राज्यात वाढत असलेल्या बेकायदा बांधकामांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, पर्ससीन नेट तसेच एलईडी लाईटच्या वापरामुळे सागरी | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | किनारपट्टी भागात मत्स्यदुष्काळाची परिस्थिती निर्माण होणे, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला जाणे, महानंद दुध डेअरी एन.डी.बी.बी.कडे हस्तांतरीत करून गुजरातच्या दावणीला बांधण्याचा घाट घालणे, गेल्या दशकभरात उद्योगधंद्यात झालेली अधोगती, विविध भरती प्रक्रियेत उघडकीस आलेला आर्थिक गैरव्यवहार, तलाठी भरती प्रक्रियेत झालेली पेपरफुटी व गैरव्यवहार, चुकीच्या वाळू धोरणामुळे शासकीय महसूलाचे झालेले नुकसान व वाळू माफियांकडून चढ्या दराने वाळू विक्री केल्याने सर्वसामान्य जनतेची होणारी लूट, विविध विभागात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असताना भरती प्रक्रिया रखडल्या असताना कंत्राटी पद भरती करून आरक्षण संपविण्याकडे सरकारचा कल, भाप्रसे अधिकाऱ्यांच्या जागेवर कनिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्यामुळे भाप्रसे अधिकाऱ्यांचे होत असलेले खच्चीकरण, विविध यंत्रणांकडून चौकशी सुरू असलेल्या अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या ठिकाणी | |

| अ. क. | सदस्यांचे नांव | विषय | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | नियुक्ती दिल्यामुळे प्रशासनाचा उडालेला बोजवारा, बनावट दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन नोकरी व पदोन्नती मिळविलेल्या उमेदवारांवर ठोस कारवाई न करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्यात सरकारला आलेले अपयश व त्यामुळे राज्याचे झालेले नुकसान, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका". | |

***

## विवरण क्रमांक -४९

## नियम २९३ अन्वये सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबीवर चर्चेबाबत अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -५०

## श्वेतपत्रिका सभागृहाच्या पटलावर ठेवणे

निरंक

***

## विवरण क्रमांक -५१

## मत विभाजन

## निरंक

***

## विवरण क्रमांक -५२

## दिनांक २५ फेब्रुवारी, २०२४ ते ०१ मार्च, २०२४ या कालावधीत प्राप्त तारांकित/ अतारांकित/अल्पसूचना प्रश्न व प्रश्नातून उद्भवलेल्या अर्धा-तास चर्चा यावरील कार्यवाहीचे विवरण पत्र.

निरंक

***

## विवरण क्रमांक -५३

## तारांकित व अतारांकित प्रश्नासंबंधी माहिती

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -५४

## तारांकित प्रश्नांची विभाग निहाय सांख्यिकीय माहिती

निरंक

***

## विवरण क्रमांक -५५

## मूळ अतारांकित प्रश्नांची विभाग निहाय सांख्यिकीय माहीती

निरंक

***

## विवरण क्रमांक -५६

## अल्पावधी सूचना प्रश्नांसंबंधी कार्यवाहीचे विवरण

निरंक

***

## विवरण क्रमांक -५७

## तोंडी उत्तरीत झालेल्या तारांकित स्वीकृत प्रश्नांचे विवरणपत्र

**निरंक**

***

(शा.म.मु.) एचबी २३०—१२ (५०—५-२०२४)

## विवरण क्रमांक -५८

## अर्धा-तास चर्चा

## (म.वि.स. नियम ९४ अन्वये प्रश्नातून उद्‌भवणाऱ्या सूचना).

## सन २०२४ चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

निरंक

***

## विवरण क्रमांक -५९

## प्रश्नांच्या उत्तरातून उद्भवणाऱ्या पुरेशा सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींविषयी महाराष्ट्र विधानसभा नियम ९४ अन्वये अर्धा-तास चर्चा उपस्थित करण्यासाठी आलेल्या सूचनांचे विवरणपत्र

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -६०

## प्रश्नांसंबंधी विशेष माहिती

**निरंक**

***

## विवरण क्रमांक -६१

## महाराष्ट्र विधानसभा

## वैधानिक प्राधिकाराखाली विधानसभेसमोर ठेवलेल्या कागदपत्रांची यादी

## द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२४

**टीप.—** (एक) अनुक्रमांक १ ते ८ वरील अधिसूचना सन २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशन कालावधीत महाराष्ट्र विधानसभेसमोर ठेवण्यात आल्या होत्या. परंतु स्तंभ (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संबंधित अधिनियमातील तरतुदीनुसार या अधिवेशनात देखील या अधिसूचनांमध्ये फेरफार करता येईल किंवा त्या रद्द करता येतील.

(दोन) यादीच्या स्तंभ (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संबंधित अधिनियमाच्या तरतुदीनुसार स्तंभ (२) मध्ये उल्लेखिलेल्या ज्या नियमात फेरफार करता येतील किंवा ते रद्द करता येतील, त्या नियमात फेरफार करण्यासंबंधीच्या प्रस्तावांच्या सूचना, महाराष्ट्र विधानसभा नियम २९० अन्वये देता येतील.

| अ. क्र. | विषय | अधिसूचना विधानमंडळ सचिवालयास सादर झाल्याचा दिनांक | अधिसूचना विधानसभा सभागृहासमोर ठेवल्याचा दिनांक | अधिसूचना विधानसभेत ठेवण्यासाठी वैधानिक प्राधिकार |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | महाराष्ट्र देशी मद्य (सुधारणा) नियम, २०२३ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक बीपीए ०४२२/प्र.क्र. ९१/राउशु-२, दिनांक ०५ जून, २०२३. | १३ ऑक्टोबर, २०२३ | ०७ डिसेंबर, २०२३ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ मधील पोट-कलम (४) अन्वये |
| २ | मुंबई विदेशी मद्य (सुधारणा) नियम, २०२३ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक बीपीए ०४२२/प्र.क्र. ९१/राउशु-२, दिनांक ०५ जून, २०२३. | १३ ऑक्टोबर, २०२३ | ०७ डिसेंबर, २०२३ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ मधील पोट-कलम (४) अन्वये |

| अ. क्र. | विषय | अधिसूचना विधानमंडळ सचिवालयास सादर झाल्याचा दिनांक | अधिसूचना विधानसभा सभागृहासमोर ठेवल्याचा दिनांक | अधिसूचना विधानसभेत ठेवण्यासाठी वैधानिक प्राधिकार |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ३ | महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) (दुसरी सुधारणा) नियम, २०२३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक वेतन १८२३/प्र.क्र. ३/टीएनटी-३, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३. | २१ नोव्हेंबर, २०२३ | ०७ डिसेंबर, २०२३ | महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ च्या कलम १६ मधील पोट-कलम (४) अन्वये |
| ४ | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एआरपी-२०२३/प्र. क्र.५१/तांशि ४ , दिनांक २१ जून, २०२३. | २४ नोव्हेंबर, २०२३ | ०७ डिसेंबर, २०२३ | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम २३ मधील पोट-कलम (२) अन्वये |
| ५ | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदव्युत्तर पदवी तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०२३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एआरपी-२०२३/ प्र.क्र.५२/तांशि ४, दिनांक २१ जून, २०२३. | २४ नोव्हेंबर, २०२३ | ०७ डिसेंबर, २०२३ | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम २३ मधील पोट-कलम (२) अन्वये |

| अ. क्र. | विषय | अधिसूचना विधानमंडळ सचिवालयास सादर झाल्याचा दिनांक | अधिसूचना विधानसभा सभागृहासमोर ठेवल्याचा दिनांक | अधिसूचना विधानसभेत ठेवण्यासाठी वैधानिक प्राधिकार |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ६ | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व व पदव्युत्तर पदवी तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेश पात्रतेच्या अटी व शर्ती) (सुधारणा) नियम, २०२३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एआरपी-२०२३/प्र.क्र.४८/तांशि ४, दिनांक २१ जून, २०२३. | २४ नोव्हेंबर, २०२३ | ०७ डिसेंबर, २०२३ | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम २३ मधील पोट-कलम (२) अन्वये |
| ७ | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व व पदव्युत्तर पदवी तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेश पात्रतेच्या अटी व शर्ती) (सुधारणा) नियम, २०२३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक प्रनिधो-२०२३/प्र.क्र.४८/तांशि ४, दिनांक २१ ऑगस्ट, २०२३. | २४ नोव्हेंबर, २०२३ | ०७ डिसेंबर, २०२३ | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम २३ मधील पोट-कलम (२) अन्वये |

| अ. क्र. | विषय | अधिसूचना विधानमंडळ सचिवालयास सादर झाल्याचा दिनांक | अधिसूचना विधानसभा सभागृहासमोर ठेवल्याचा दिनांक | अधिसूचना विधानसभेत ठेवण्यासाठी वैधानिक प्राधिकार |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ८ | महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम १९६४ च्या अनुसूचीमधून अनुक्रमांक (८) वरील चंदन वृक्षाचे नाव वगळण्याबाबत प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक टीआरएस-०७/२०२०/प्र.क्र. ८४/फ-६, दिनांक २३ मार्च, २०२१. | २४ नोव्हेंबर, २०२३ | ०७ डिसेंबर, २०२३ | महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४ च्या कलम १५ मधील पोट-कलम (२) अन्वये |
| ९ | महाराष्ट्र वन (सुधारणा) नियमावली, २०२१ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक टिआरएस-०६/ २०२१/ प्र.क्र. १६९/फ-६, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ | ५ जानेवारी, २०२४ | २६ फेब्रुवारी, २०२४ | भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम ५१ अन्वये |
| १० | हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठ, मुंबई संदर्भातील दि.३० ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या अधिसूचनेतील सुधारणा प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण-२०२३/ प्र.क्र.७७/ विशि-३, दिनांक २६ जून, २०२३. | ७ फेब्रुवारी, २०२४ | २६ फेब्रुवारी, २०२४ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३ मधील पोट-कलम (६) अन्वये |

| अ. क्र. | विषय | अधिसूचना विधानमंडळ सचिवालयास सादर झाल्याचा दिनांक | अधिसूचना विधानसभा सभागृहासमोर ठेवल्याचा दिनांक | अधिसूचना विधानसभेत ठेवण्यासाठी वैधानिक प्राधिकार |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ११ | कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा संदर्भातील दि.२७ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या अधिसूचनेतील सुधारणा प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण-२०२३/ प्र.क्र.७७/विशि-३, दिनांक २६ जून, २०२३. | ७ फेब्रुवारी, २०२४ | २६ फेब्रुवारी, २०२४ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३ मधील पोट कलम (६) अन्वये |
| १२ | महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय उच्चतर शिक्षा परिषद संदर्भातील अधिसूचना क्रमांक E:६६१३५२/ HTED-२४०११/ ९/ २०२३-MHT-(UE-३), दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३. | ७ फेब्रुवारी, २०२४ | २६ फेब्रुवारी, २०२४ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ७८ मधील पोट-कलम (३) अन्वये |
| १३ | "मुंबई विदेशी मद्य (सुधारणा) नियम, २०२४ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एफएलआर ०६२२/ प्र.क्र.१५०/राउशु-२, दिनांक ९ जानेवारी, २०२४. | १५ फेब्रुवारी, २०२४ | २६ फेब्रुवारी, २०२४ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ मधील पोट-कलम (४) अन्वये |

| अ. क्र. | विषय | अधिसूचना विधानमंडळ सचिवालयास सादर झाल्याचा दिनांक | अधिसूचना विधानसभा सभागृहासमोर ठेवल्याचा दिनांक | अधिसूचना विधानसभेत ठेवण्यासाठी वैधानिक प्राधिकार |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १४ | "मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क) (सुधारणा) नियम, २०२४ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एफएलआर ०६२२/ प्र.क्र.१५०/ राउशु-२, दिनांक ९ जानेवारी, २०२४. | १५ फेब्रुवारी, २०२४ | २६ फेब्रुवारी, २०२४ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ मधील पोट-कलम (४) अन्वये |

**विधान भवन :**
मुंबई
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२४.

**जितेंद्र भोळे,**
सचिव(१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

------------

## विवरण क्रमांक -६२
## महाराष्ट्र विधानसभा
## द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन २०२४ च्या कार्यावलीचे पुरवणी पत्र
## कार्यावलीतील बाब क्रमांक "अकरा" सभागृहासमोर ठेवण्यात आलेल्या कागदपत्रांच्या यादीचे पुरवणी पत्र. (अनुक्रमांक "चौदा" नंतर पुढील बाबी वाचाव्यात.)

| अ. क्र. | विषय | विधानसभेत ठेवण्यात आलेला दिनांक | विधानसभेत ठेवण्यासाठी वैधानिक प्राधिकार |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| **अधिसूचना** | | | |
| **निरंक** | | | |
| **विविध महामंडळाचे अहवाल इत्यादी कागदपत्रे** | | | |
| १. | महाराष्ट्र भूविकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचे सन २०१९-२०२० व सन २०२०-२०२१ या वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल. | २७ फेब्रुवारी २०२४ | कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ३९५ च्या पोट-कलम (१) मधील खंड (ब) अन्वये. |
| २. | तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचा अनुक्रमे तेवीसावा व चोवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल. | २७ फेब्रुवारी २०२४ | तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ च्या कलम ४७ चे पोट-कलम (४) अन्वये, |
| ३. | महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा छप्पन्नावा वार्षिक अहवाल. | २७ फेब्रुवारी २०२४ | कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ३९५ च्या पोट-कलम (१) मधील खंड (ब) अन्वये, |

| अ. क्र. | विषय | विधानसभेत ठेवण्यात आलेला दिनांक | विधानसभेत ठेवण्यासाठी वैधानिक प्राधिकार |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ४. | महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचा दिनांक १ जानेवारी २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधीतील सोळावा वार्षिक अहवाल. | २८ फेब्रुवारी २०२४ | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २५ च्या पोट-कलम (४) अन्वये, |
| ५. | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे व त्यावरील महालेखापाल (लेखापरीक्षा-१) महाराष्ट्र यांचा अलग लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील महामंडळाचे अनुपालन अहवाल. | २८ फेब्रुवारी २०२४ | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ च्या कलम ४७ च्या पोट-कलम (४) अन्वये, |
| ६. | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचे सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वर्षांचे वार्षिक लेखा अहवाल आणि त्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अलग लेखापरीक्षा अहवाल. | २८ फेब्रुवारी २०२४ | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम १९ च्या पोट-कलम (४) अन्वये, |

| अ. क्र. | विषय | विधानसभेत ठेवण्यात आलेला दिनांक | विधानसभेत ठेवण्यासाठी वैधानिक प्राधिकार |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ७. | नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल. | २९ फेब्रुवारी २०२४ | कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ३९४ च्या पोट-कलम (२) अन्वये, |
| ८. | महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल. | २९ फेब्रुवारी २०२४ | महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या कलम १९ च्या पोट-कलम (२) मधील तरतुदीनुसार, |
| ९. | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा अठ्ठावन्नावा वार्षिक अहवाल. | २९ फेब्रुवारी २०२४ | कंपनी अधिनियम, २०१३ मधील कलम ३९५ (१) तसेच महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मेमोरंडम आणि आर्टीकल्स ऑफ असोसिएशनच्या कलम ११८ अन्वये, |
| १०. | महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे वैधानिक लेखा परिक्षण अहवाल. | २९ फेब्रुवारी २०२४ | महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ च्या कलम ३७ (२) अन्वये, |

| अ. क्र. | विषय | विधानसभेत ठेवण्यात आलेला दिनांक | विधानसभेत ठेवण्यासाठी वैधानिक प्राधिकार |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ११. | महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक लेखापरीक्षण अहवाल. | २९ फेब्रुवारी २०२४ | महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ च्या कलम ३७ (२) अन्वये, |
| १२. | श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई यांचे सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल. | २९ फेब्रुवारी २०२४ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १३६ च्या पोट-कलम (२) अन्वये, |
| १३. | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल. | २९ फेब्रुवारी २०२४ | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अधिनियम, १९८९ च्या कलम २८ च्या पोट-कलम (३) अन्वये, |
| १४. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह). | २९ फेब्रुवारी २०२४ | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १३५ च्या पोट-कलम (४) अन्वये, |

| अ. क्र. | विषय | विधानसभेत ठेवण्यात आलेला दिनांक | विधानसभेत ठेवण्यासाठी वैधानिक प्राधिकार |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १५. | कोकण विकास महामंडळ, मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल. | २९ फेब्रुवारी २०२४ | कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ३९५ च्या पोट-कलम (१) मधील खंड (ब) अन्वये, |
| १६. | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल | ०१ मार्च २०२४ | विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १०५ च्या पोट-कलम (२) अन्वये, |

**विधान भवन :**
मुंबई
दिनांक : १ मार्च, २०२४.

**जितेंद्र भोळे,**
सचिव(१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

------------

RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

**वर्ष १०, अंक १३]** **शुक्रवार, मार्च १, २०२४/फाल्गुन ११, शके १९४५** **[पृष्ठ १, किंमत : रुपये ४.००**

**असाधारण क्रमांक २०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई ४०० ०३२,

दिनांकित १ मार्च, २०२४.

**भारताचे संविधान.**

क्रमांक २९९४/अ.—महाराष्ट्राच्या राज्यपालांचा खालील आदेश सर्वसाधारण माहितीसाठी प्रकाशित करण्यात येत आहे :—

“मी, रमेश बैस, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२), उपखंड (क) द्वारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, याद्वारे शुक्रवार, दिनांक १ मार्च, २०२४ रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे.

**रमेश बैस,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.”

**जितेंद्र भोळे,**
सचिव(१)(कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई ४०० ०३२,

दिनांकित १ मार्च, २०२४.

**भारताचे संविधान.**

क्रमांक २९९५/ई-२.—महाराष्ट्राच्या राज्यपालांचा खालील आदेश सर्वसाधारण माहितीसाठी प्रकाशित करण्यात येत आहे :—

“मी, रमेश बैस, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२), उपखंड (क) द्वारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, याद्वारे शुक्रवार, दिनांक १ मार्च, २०२४ रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे.

**रमेश बैस,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.”

**जितेंद्र भोळे,**
सचिव(१)(कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.





ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई